




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## थोडक्यात...



### मुंबई-अहमदाबाद महामार्गावर खड्ड्यांमुळे भीषण अपघात

डहाणू (समर्थ गांवकरी) : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील विवळवेढे उड्डाणपुलावर शुक्रवारी सकाळी 11:20 च्या सुमारास खड्ड्यांमुळे एक भीषण अपघात घडला. दोन ट्रकच्या दरम्यान कार चिरडली गेल्याने झालेल्या या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, त्यातील प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे महामार्गाच्या दुरवस्थेचा आणि रखडलेल्या कामांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### 81 देशातून 24,600 भारतीय हद्दपार

मुंबई (समर्थ गांवकरी) : अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी जानेवारी 2025 मध्ये राष्ट्राध्यक्षपदाची दुसऱ्यांदा सुत्रे हाती घेतली आणि अवैध स्थलांतरितांच्या विरोधात कारवाई करण्यास सुरुवात केली. हाताला बेड्या ठोकलेले भारतीय नागरिक अमेरिकेच्या लष्करी विमानातून भारताच्या विमानतळावर उतरलेले आपण पाहिले. पण 2025 या वर्षात अमेरिका नाही तर आखाती देशांतून सर्वाधिक भारतीय नागरिकांची हद्दपारी झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या आखाती देशाने मोठ्या प्रमाणात पाकिस्तानी नागरिकांची हकालपट्टी केलेली आहे. त्याशिवाय भारतीय नागरिकांचीही हद्दपारी केली.

# वडापाव, पाण्याची बाटली, जेवणाचा दर किती?

## अहिल्यानगर महापालिका निवडणूक

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचे दर महापालिका निवडणूक यंत्रणेने जाहीर केले आहेत. उमेदवाराने प्रचार करताना कार्यकर्त्यांना वडापाव दिल्यास प्रत्येकी १५ रुपये, चहा पाजल्यास १० रुपये, भेळीसाठी २० रुपये, शाकाहारी साध्या जेवणासाठी ११५ रुपये, विशेष शाकाहारी जेवणासाठी १८० रुपये, मांसाहारी जेवणासाठी २४० रुपये तर बिर्याणी प्लेटसाठी १५० रुपये दर आकारला जाणार आहे.

गेल्या वर्षी विधानसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत उमेदवारांच्या प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्यासाठी आकारलेले दरच यंदाच्या महापालिका निवडणुकीसाठी कायम ठेवल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले. हेच दर काही दिवसांपूर्वी झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीतील उमेदवारांसाठीही आकारले गेले होते.

उमेदवार त्यांच्या प्रचारात कोणते साहित्य वापरतात, यावर निवडणूक यंत्रणेकडून लक्ष ठेवले जाते. त्याची तपासणी करण्यासाठी पथके नियुक्त केले जातात तसेच त्याचे चित्रीकरण केले जाते. अहिल्यानगर महापालिका डॉ वर्ग आहे. येथे निवडणुकीसाठी उमेदवाराला खर्चाची मर्यादा ९ लाख रुपये निवडणूक आयोगाने ठरवून दिली आहे. अर्थात उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर हा खर्च नोंदवला जातो. उमेदवाराला केलेल्या खर्चाची नोंद रोजच्या रोज निवडणूक कार्यालयाकडे सादर करावी लागते. बाजारातील



दर लक्षात घेऊन हे दर ठरवले जातात. प्रिंटिंग, केटरिंग, सजावट, सभा, व्हिडिओग्राफी, फोटोग्राफी, फलक यानुसार हे दर आहेत.

छपाई दर : प्रचार फ्लेक्स (प्रती चौरस फूट) १२ रु. १० पैसे, डिजिटल फ्लेक्स ७ रु. ४३ पैसे, चार रंगांमधील पोस्टर ११ ते १३ रु. एफोर पोस्टर (प्रति हजार) ६ हजार रु., रंगीत स्टिकर (प्रति हजार) ८ हजार रु. एका रंगातील स्टिकर पेपर (प्रति हजार) ५ हजार रु. पन्नास पानांचे पुस्तक ७५० रु. प्रति, एफोर पत्रक (प्रति हजार) ३६८५ रु. हँड बिल (प्रति हजार) २७०० रु. टोपी ८५, गांधी टोपी १० रु., टी-शर्ट १५०, शाल १५० ते २५० रू., फेटा ११० ते ३००, कागदी टोपी ५, कागदी झेंडा ५, कापडी झेंडा ५० रु., कापडी फलक ३००, छपाई केलेला पंचा २५ ते ४० रु.

खाद्यपदार्थ दर : चहा १० रु., कॉफी १५, एक लिटर पाण्याची बाटली १७, वीस लिटरची बाटली १४०, पाण्याचा जार ४० रु., वडापाव १५, भाजी एक प्लेट २०, पॅटीस, सामोसा व कचोरी १५ (प्रत्येकी), भेळ २० रु., ढोकळा १०० ग्रॅम ३० रु. साधे शाकाहारी जेवण ११५, विशेष शाकाहारी जेवण १८०, मांसाहारी जेवण २४०, बिर्याणी प्लेट १५०, पार्ले बिस्किट पुडा १० रु., आईस्क्रीम छोटा कप १०, मोठा कप २०, शीतपेय १५, पाच हजार लिटर पाण्याची टाकी २२००, लाडू चिवडा पाकीट (शंभर ग्रॅम) ३० रु., पोहे २०, डोसा व उत्तप्पा ५० रु. मिसळ पाव-भाजी पाव ६०, पावभाजी ६०, साबुदाणा खिचडी किंवा वडा २५ रु. प्रति प्लेट

सजावट : पुष्पगुच्छ १०० रु., व्हीआयपी पुष्पगुच्छ ३५०, छोटा हार ३०, मोठा हार ८० रु., सफारी हार १ हजार रू., मोठा सफारी हार ५ हजार रु., फटाक्यांची १ हजारची माळ ७५०, फॅन्सी फटाके (२५ शॉट्स) ११०० रु.

सभा : व्यासपीठ प्रती चौरस फूट २५ रु., मंडप प्रति चौरस फूट १५ रु., बांबूचे बॅरिकेट्स प्रति फूट ५० रु., नेट बॅरिकेट्स प्रति फूट ४५ रु., मोठी स्वागत कमान ८ हजार रु. छोटी स्वागत कमान ४ हजार रु., प्रती खुर्ची प्लास्टिक १० रु., कुशन खुर्ची ३० रु., फिरती खुर्ची २५० रू. प्रति नग, रोज.

### अंगरक्षक, छायाचित्र, कटआउट

सोफा १५०० रु. रोज, व्हीआयपी टोपी ३५० रु., साधी टोपी १५० रु., जनरेटर १२५ केव्ही १५ हजार रु., रोज, ट्यब ३० रु. रोज, हॅलोजन बल्ब १५० रु. रोज, फॅन १५० रु. रोज, हेलीपॅड १ हजार रु. (तांत्रिक मदत), व्हिडिओग्राफी १३८९ रू. रोज, छायाचित्र ४ रु. प्रति कॉपी, ड्रोन कॅमेरा ६ हजार रू. रोज, एलईडी वॉलपेपर ३२ रू. फूट, क्रेन १३२५० रु. रोज, स्पीकर प्रतिनग प्रतिदिन २०० रु., अंगरक्षक प्रति नग प्रतिदिन १ हजार रु. महापुरुष प्रतिमा प्रतिदिन १०० रु. कटआउट चौरस फूट १२ रु. १० पैसे.

# ‘सेनगरच्या जामिनाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान’

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

“सर्वोच्च न्यायालयावर विश्वास आहे, दोषी कुलदीपसिंग सेनगरची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे,” असे उन्नाव बलात्कार प्रकरणातील पीडितेच्या आईने सांगितले. भाजपमधून हकालपट्टी करण्यात आलेल्या सेनगर याच्या जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती देण्याच्या निर्णयाविरोधात शुक्रवारी दिल्ली उच्च न्यायालयाबाहेर आंदोलन करण्यात आले. या वेळी पीडितेच्या आईनेही आंदोलनात सहभाग घेतला.



■ उन्नाव पीडितेच्या आईचे संकेत, दिल्ली न्यायालयासमोर आंदोलन

# बांगलादेशातील परिस्थितीबद्दल भारताला चिंता

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

बांगलादेशातील अल्पसंख्याकांविरोधात सातत्याने द्वेषपूर्ण हल्ले केले जात आहेत ही गंभीर चिंतेची बाब आहे, अशी टिप्पणी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी केली. बांगलादेशात फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक असाव्यात या भूमिकेचाही जयस्वाल यांनी पुनरुच्चार केला.

‘बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी’चे (बीएनपी) प्रभारी अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान हे मायदेशी परत आल्याबद्दल परराष्ट्र मंत्रालयाने सावधपणे प्रतिक्रिया



व्यक्त केली. बांगलादेशातील निवडणुका सर्वसमावेशक होण्याच्या संदर्भात या घटनेकडे पाहिले पाहिजे, असे मत जयस्वाल यांनी व्यक्त केले. म्यामेनसिंह येथे दीपू चंद्र दास या हिंदू युवकाच्या झुंडबळीचाही त्यांनी निषेध केला.

जयस्वाल म्हणाले, “बांगलादेशात हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्धांसह अल्पसंख्याकांवर सतत होणारे द्वेषपूर्ण हल्ले ही गंभीर चिंतेची बाब आहे. आम्ही हिंदू युवकाच्या हत्येचा निषेध करतो आणि यातील दोषींना शिक्षा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.” आम्ही तेथील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत, विद्यमान हंगामी सरकारच्या काळात तेथे अल्पसंख्याकांविरोधात २,९००पेक्षा जास्त हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत, असे जयस्वाल यांनी सांगितले.

विद्यार्थी नेता शरीफ उस्मान हादी यांच्या हत्येनंतर बांगलादेशात गेल्या काही दिवसांमध्ये पुन्हा एकदा अशांतता निर्माण झाली आहे. तसेच भारताविरोधातील भावनाही वाढल्या आहेत. हादीच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा दावा बांगलादेशातील काही गटांनी केला. मात्र, हा आरोप भारताने फेटाळून लावला आहे.

बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ल्यांचा निषेध करण्यासाठी ‘हिंदू संहती’ या हिंदुत्ववादी संघटनेने कोलकात्यामधील बांगलादेशच्या उपउच्चायुक्तालयाबाहेर शुक्रवारी निदर्शने केली. या संघटनेच्या तीन सदस्यीय शिष्टमंडळाने बांगलादेशच्या वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि त्यांना सहा मुद्द्यांचे निवेदन सादर केले. दीपू चंद्र दासच्या मारेकऱ्यांना आणि या गुन्ह्याकडे कानाडोळा करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी त्यांनी केली.

# संगमनेरला ५१ कोटीच्या विकासकामांचा आज शुभारंभ

## मंत्री विखे पाटील, आमदार खताळ यांची उपस्थिती

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील निळवंडे, तळेगाव, मालदाड, गुंजाळवाडी, वडगाव लांडगा, धांदरफळ खुर्द, चंदनापुरी, हिवरगाव पावसा, पिंपरणे या गावांत जिल्हा नियोजन आणि आमदार निधीतून मंजूर झालेल्या सुमारे ५१ कोटी ३९ लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या शुभारंभ आणि लोकार्पण सोहळा राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते शनिवारी( ता.२७) सकाळी १० वाजेपासून सुरूवात होणार असून या कार्यक्रमाची सांगता संध्याकाळी पिंपरणे येथे सभेने होणार आहे.

याचबरोबर उर्ध्व प्रवरा (निळवंडे) प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील मुख्य रस्ता पुलाचे बांधकाम करणे, जलसंपदा आणि लघु पाटबंधारे विभागाच्यावतीने निळवंडे डाव्या कालव्यावरील निमगाव भोजापूर, सायखिंडी, वेल्हाळे, घुलेवाडी, खांजापूर, कुरण, तळेगाव अशा दहा लोखंडी पुलाचे लोकार्पण (४ कोटी ५८ लाख), तळेगाव येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन (१ कोटी ६० लाख), मालदाड येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजना रस्त्याचे लोकार्पण (१७ कोटी २९ लाख), गुंजाळवाडी येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन (१ कोटी ९० लाख), वडगाव लांडगा येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच निळवंडे डावा कालव्यावरील एस्केपचे भूमिपूजन (५ कोटी २१ लाख), धांदरफळ खुर्द येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांचा लोकार्पण सोहळा (१ कोटी ३८ लाख व

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन अंतर्गत नव्याने मंजूर झालेल्या मिर्झापूर- धांदरफळ खुर्द .या रस्त्यासाठी ६ कोटी ५९ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. चंदनापुरी येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन (३ कोटी ८१ लाख), हिवरगाव पावसा येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन निळवंडे उजव्या कालव्यावरील 18 लोखंडी पुलांचे लोकार्पण तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुलांचे लोकार्पण (५ कोटी ८ लाख), तसेच पिंपळनेर येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या पिंपळनेर ते कोळवाडी रस्त्याचे लोकार्पण (१० कोटी ६४ लाख ) असे एकूण ५१ कोटी ३९ लाख रुपयांचे भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा होणार असून जाहीर सभाही होणार आहे. तरी या कार्यक्रमास वरील गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संगमनेर तालुका महायुतीच्यावतीने करण्यात आले आहे.

कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर, अवजारे व स्प्रेयर ३३ लाभार्थ्यांना ३५ लाख २५ हजार रुपये, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना ८ लाभार्थी प्रतिलाभार्थी २ लाख रुपयाप्रमाणे १६ लाख रुपये आणि एमआयडीएच अंतर्गत हरितगृह व शेडनेट १४ लाभार्थ्यांना १ कोटी ५३ लाख रुपयांचे अनुदान धांदरफळ येथील कार्यक्रमात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरित केले जाणार आहे.






# माजी महापौर देवमाने यांची जनसुराज्यमध्ये घरवापसी

## पक्षप्रवेशामुळे शहरातील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची

सांगली : (समर्थ गांवकरी)

महापालिका निवडणुकीत महायुतीने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला मिरजेत धक्का देत असताना सांगलीत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाने भाजपला धक्का दिला. महायुती अथवा महाविकास आघाडीच्या उमेदवारांची नावे अद्याप निश्चित झालेली नसली तरी संभाव्य उमेदवार पळवापळवीला जोर आला आहे. माजी उपमहापौर देवमाने यांनी गेल्याच आठवड्यात झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या मेळाव्यात जनसुराज्य पक्षातून बाहेर पडून प्रवेश केला होता. एकीकडे राष्ट्रवादीकडे दिग्गज कार्यकत्यार्ंचा ओढा होता. दोन माजी महापौरासह १५ माजी नगरसेवकांनी पक्ष प्रवेश केला होता. यामुळे महायुतीची राजकीय गणिते जटिल बनत चालली होती. अशातच पुन्हा जनसुराज्य शक्तीचे प्रदेशाध्यक्ष कदम यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली महायुतीतून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांची घरवापसी घडवून आणली आहे. आज देवमाने यांचे पुन्हा जनसुराज्यमध्ये स्वागत करत असताना माजी नगराध्यक्ष डॉ. महादेव



कुरणे, पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रभागातील कार्यकर्त्यांच्या दबावामुळे घरवापसीचा निर्णय घेतला असल्याचे श्री. देवमाने यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षानेही चार माजी नगरसेवकांचा पक्ष प्रवेश शहर जिल्हाध्यक्ष प्रा. पद्माकर जगदाळे यांनी पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते घडवून आणला. यामध्ये स्नेहल सावंत, अभिजित भोसले, रज्जाक शेख, सचिन सावंत यांचा समावेश आहे.

# रंगोत्सव सेलिब्रेशन व बक्षीस वितरण सोहळा संपन्न

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देणारा, रंगांच्या जादूने मन मोहित करणारा रंगोत्सव सेलिब्रेशन व बक्षीस वितरण सोहळा वसुंधरा अकॅडमी,प्री स्कूलमध्ये अत्यंत जल्लोषात व उत्साहाच्या भरात संपन्न झाला. या सोहळ्यामुळे संपूर्ण शाळा परिसर रंग, आनंद आणि सर्जनशीलतेने उजळून निघाला.




कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्री स्कूलच्या छोट्या कलाकारांचा सहभाग असलेला रंगोत्सव उपक्रमाचा बक्षीस वितरण सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या अप्रतिम कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल्स, प्रमाणपत्रे व आकर्षक बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्री स्कूलच्या छोट्यांना बक्षीस, मेडल, ट्रॉफी, प्रमाणपत्र या शब्दांचा अर्थ कळत नव्हता परंतु पारितोषिक स्वीकारताना त्यांच्या चेहऱ्यावर झळकणारा आत्मविश्वास व आनंद अविस्मरणीय व वाचनीय होता.

प्री स्कूल मधील चिमुरडी सारंगी प्रदीप भोर या प्लेग्रुप मधील विद्यार्थिनीस आंतरराष्ट्रीय रंगभरण स्पर्धेत चौथा क्रमांक मिळाला. गोल्ड मेडल व कॅमल कलरिंग किट व प्रमाणपत्र देऊन तिचा सन्मान करण्यात आला. सिनियर केजी मधील अद्विक अदिराज भांगरे या विद्यार्थ्यास आर्ट मेरिट अवॉर्ड ही ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय ज्युनिअर केजी व सिनियर केजीतील 12 विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, दहा विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल, आठ विद्यार्थ्यांना ब्रांझ मेडल, विद्यार्थ्यांना सरप्राईज गिफ्ट व मेडलने सन्मानित केले. प्रीस्कूलच्या छोट्या मित्रांचा हा सन्मान हा त्यांच्यातील सुप्त कलांचा एक उद्रेक होता. या छोट्यांना बक्षीस स्वीकारताना बघणं खरंच खूप छान होतं. या रंगीबेरंगी सोहळ्यास वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख मॅडम, उपप्राचार्या राधिका नवले, शिक्षकवृंद तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक करत,

"कला ही केवळ छंद नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची मजबूत पायाभरणी आहे. प्रीस्कूलच्या सर्व शिक्षकांनी रंगोत्सव उपक्रमासाठी मेहनत घेतली. संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, सचिव मा. विक्रम नवले, संस्थेच्या कोषाध्यक्ष कोषाध्यक्ष व वसुंधरा अकॅडमीचे प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, संस्थेच्या सहसचिव प्राचार्य अल्फोंसा डी., उपप्राचार्य राधिका नवले व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.शेवटी आभार प्रदर्शनाने रंगांच्या या दुनियेची सांगता झाली.

# आ. सतिश चव्हाण यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीला मोठे यश

**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच झालेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार सतिश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ७४ पैकी ३८ जागांवर दणदणीत विजय मिळवून जिल्हयात सर्वाधिक नगरसेवक निवडून आलेल्या यादीत राष्ट्रवादी (अजीत पवार गट) कॉंग्रेस पार्टी दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. नगर परिषदेच्या निवडणूकीत जिल्हाध्यक्ष आ. सतिश चव्हाण यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने गंगापुर खुलताबाद व कन्नड या ठिकाणी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार उभे केले होते यामध्ये खुलताबाद व कन्नड येथील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचा पराभव झाला परंतु गंगापुर येथील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय जाधव हे विजयी झाले यामुळे जिल्हयात एकूण १६० नगरसेवकांच्या



जागेसाठी झालेल्या निवडणूकीत राष्ट्रवादीने एकुण ६८ उमेदवार उभे केले तर नगराध्यक्षपदाचे ०३ उमेदवार असे एकूण ७१ उमेद्वार निवडणूकीच्या रिंगणात होते त्यापैकी ३८ नगरसेवक आणि ०१ नगराध्यक्ष असे एकूण ३९ उमेदवार विजयी झाले आहेत खुलताबाद आणि कन्नड येथील नगराध्यक्ष पदाचे उमेदवारांचा पराजय झाला असला तरी कन्नडमध्ये सर्वाधीक १२ नगरसेवक आणि खुलताबाद मध्ये ०९ नगरसेवक विजयी झालेले आहेत. त्यामुळे या दोनही नगर परिषदेत राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला आहे तर जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. आमदार सतिश चव्हाण यांनी पदवीधर मतदार संघात केलेली. विकास कामे, कार्यशैली, दांडगा जनसंपर्क यासह विवीध बाबी त्यांच्या साठी जमेच्या बाजू ठरल्या आहेत. विधान सभा निवडणूकीत अगदी थोड्या मतांनी स्विकारावा लागलेला पराभव जिव्हारी लावुन न घेता तितक्याच जोमाने आणि लवकर पुन्हा कामाला केलेली सुरुवात त्यामुळे मिळालेली जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी अगदी कुशलतेने सांभाळत आहेत. त्यमुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीत देखिल आमदार सतिश चव्हाण यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे उमेदवार निवडणूक लढवतील आणि चांगले यश मिळविले जाईल. हे मिळविलेले यश म्हणजेच २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची नांदी असेल.

# महायुतीमधील राष्ट्रवादी भाजपा यांची सहमती एक्सप्रेस मात्र शिंदे गट वेगळ्याच निर्णयात




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरमध्ये मोठ्या प्रमाणात घडामोडी सुरू असून जागा वाटपाचे चित्र स्पष्ट न झाल्याने इच्छुक उमेदवारांनी देव पाण्यात ठेवले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि भाजप मधील जागावाटपाचा तिढा बऱ्यापैकी सुटला असून काही प्रभागातील जागांवर चर्चा सुरू आहे. शिंदे गटाने केडगाव मधील जागेवरून अंतर्गत कलह सुरू असून शिंदे गटातील दोन पदाधिकाऱ्यांनी महायुतीला डावलून थेट केडगाव मधील कोतकर गटाशी जवळीक साधली असून बुधवारी रात्री कोतकर गटातील प्रमुखांची भेट घेऊन केडगाव सह शहरातील काही प्रभागा बाबत चर्चा केली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे शिंदे गट ऐनवेळी आपली चूल कोतकर यांच्या सह वेगळी मांडू शकतो अशी चर्चा सुरू आहे. नेप्ती रोडवरील एका नेत्याच्या फार्म हाऊस वर झालेल्या शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निवडणुकीची वेगळीच रणनीती ठरत असून त्यामुळे शिंदे गट वेगळा निर्णय घेण्याची शक्यता आहे तर यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडू शकतो.

# कालव्यातून आज आवर्तन सुटणार

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ पिंपळगाव जोगा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी असून आज सायंकाळी ६ वाजता पिंपळगाव जोगा कालव्यातून आवर्तन सोडण्यात येणार असल्याची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी दिली. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी शेतकऱ्यांच्या वाढत्या पाण्याच्या गरजेचा विचार करून पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे केलेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित धरणातून पाणी सोडण्यात आल्यानंतर पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका हद्दीतील सुमारे ४७ कि.मी. अंतर पार करून हे पाणी पारनेर तालुक्यात साधारण सात ते आठ दिवसांत पोहोचणार असल्याची माहिती आमदार दाते सर यांनी दिली.

# साल्हेरवर मावळ्यांची रणगर्जना पुन्हा घुमणार

- खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली २८ डिसेंबरला शिवकालीन गडकोट संवर्धन मोहीम

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शिवकालीन गडकोट म्हणजे केवळ दगड-मातीची रचना नव्हे, तर स्वराज्याच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. या ऐतिहासिक वारशाचे जतन, संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाची जबाबदारी समाजाने सामूहिकपणे उचलली पाहिजे, या उद्देशाने आपला मावळा संघटना आणि लोकनेते खासदार नीलेश लंके यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली डिसेंबर महिन्यातील शिवकालीन गडकोट संवर्धन मोहीम किल्ले साल्हेर येथे आयोजित करण्यात आली आहे.

ही मोहीम रविवार, २८ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता नाशिक जिल्ह्यातील किल्ले साल्हेर (ता. बागलाण, सटाणा) येथे राबवली जाणार आहे. यानिमित्त शेकडो मावळे एकत्र येत गडावरील कचरा निर्मूलन, पायवाटांची स्वच्छता, झुडपे काढणे, ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि पर्यावरणपूरक उपाययोजना राबवणार आहेत. गेल्या काही महिन्यांपासून खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकाराने दर महिन्याच्या एका रविवारी राज्यातील विविध गडांवर ही मोहीम सातत्याने सुरू आहे. शिवनेरी,धर्मवीरगड, रायरेश्वर, रामशेज, तिकोणा, प्रतापगड, विश्रामगड, भुदरगड, सिंहगड या गडांवर राबवलेल्या मोहिमांना समाजातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे.साल्हेर मोहिमेद्वारेही शिवाजी महाराजांचा विचार, स्वराज्याची मूल्ये आणि इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या मोहिमेविषयी बोलताना आयोजकांनी सांगितले की, "शिवकालीन गडकोट हा आपल्या अस्मितेचा पाया आहे. त्यांचे संवर्धन म्हणजे इतिहासाचे जतन आणि भविष्यासाठी संस्कृतीचा ठेवा सुरक्षित ठेवणे होय." हजारो मावळ्यांच्या सहभागातून साल्हेरवर पुन्हा एकदा स्वराज्याची जाणीव जागी करणारी ही मोहीम ऐतिहासिक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### मावळ्यांसाठी मुक्काम व भोजनाची व्यवस्था

मोहिमेसाठी सहभागी होणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवकांसाठी शनिवार, २७ डिसेंबर रोजी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच रात्रीचे जेवण, सकाळचा नाश्ता आणि दुपारचे जेवण आयोजकांकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अहिल्यानगर व पारनेर शहरातून बसची सोय करण्यात आली असून, नोंदणीकृत व पूर्वसूचित स्वयंसेवकांनाच बसमध्ये प्रवेश दिला जाणार आहे.

या मोहिमेत सहभागी होण्यासाठी स्वयंसेवकांनी www.aaplamavla.com या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.नोंदणीची अंतिम तारीख २७ डिसेंबर, रात्री ११.५९ अशी असून, नोंदणी पूर्ण झाल्यानंतर व्हॉटस्अॅप द्वारे मोहिमेची सविस्तर माहिती पाठवली जाणार आहे. नोंदणीसंदर्भात अडचण असल्यास दिलेल्या संपर्क क्रमांकांवर मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# मेवाडच्या शौर्यगाथेवरील ऐतिहासिक महानाट्य!

## ध्रुव ग्लोबल स्कूलचा सांस्कृतिक महोत्सव; महाराणा प्रतापांचा गौरवशाली इतिहास

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेरच्या मालपाणी फाऊंडेशनद्वारा संचालित ध्रुव ग्लोबल स्कूलच्या वार्षिक सांस्कृतिक महोत्सवात यावेळी मेवाडच्या गौरवशाली इतिहासाला उजळणी देणाऱ्या महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. माध्यमिक विभागातील तिनशेहून अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागातून साकारणाऱ्या या ऐतिहासिक महानाट्यात तब्बल तीन शतके परकीय आक्रमकांच्या मनात धडकी भरवणाऱ्या बाप्पा रावलपासून ते महापराक्रमी महाराणा प्रताप यांच्या जीवनचरित्रावर झोत टाकला जाणार आहे. या दरम्यान राजस्थानातील विविध प्रांतात घडलेल्या विविध ऐतिहासिक घटना प्रत्यक्ष रंगमंचावर अनुभवण्याची संधी संगमनेरकरांना मिळणार आहे.



एखादा सामाजिक, सांस्कृतिक अथवा ऐतिहासिक विषय घेवून शाळेच्या वार्षिक सांस्कृतिक महोत्सवात त्यावर आधारित कलाकृती सादर करण्याची परंपरा ध्रुव ग्लोबल स्कूलने अव्याहत जोपासली आहे.

त्या श्रृंखलेत यंदाच्या वर्षी मेवाडच्या (राजस्थान) गौरवशाली इतिहासाची निवड करण्यात आली असून शाळेच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांकडून महापराक्रमी शासक म्हणून इतिहासाच्या पानात अजरामर असलेल्या आणि परकीय आक्रमकांना तब्बल तिनशे वर्ष भारतात येण्यापासून रोखणाऱ्या बाप्पा रावल यांच्यापासून ते बादशहा अकबराच्या लाखोंच्या फौजेवर हल्दीघाटीत तुटून पडणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या पराक्रमी जीवनावर प्रकाश टाकला जाणार आहे.

या महानाट्यात मेवाडच्या गौरवशाली इतिहासातील महत्त्वाच्या घटनांमधील राणी पद्मिनीचा ऐतिहासिक जौहर, वीर गोरा आणि बादल यांचे शौर्य, पन्नादाईंचा सर्वोच्च त्याग आणि भामाशाह यांच्या दातृत्वाची गाथा प्रत्यक्ष रंगमंचावर अनुभवण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. शाळेतील इयत्ता सहावी ते बारावीचे विद्यार्थी प्रभावी संवाद, सुबक नृत्यकला आणि दर्जेदार सादरीकरणातून हे ऐतिहासिक महानाट्य साकारणार आहेत.

हा कार्यक्रम केवळ मनोरंजनाचा नसून भावी पिढ्यांना इतिहासाची ओळख करुन देणारा ठरणार असल्याने संगमनेरकरांनी हा प्रेरणादायी ऐतिहासिक अनुभव घेण्यासाठी शनिवारी (ता.27) सायंकाळी साडेसातची वेळ राखून ठेवावी व न चुकता मालपाणी लॉन्समध्ये उपस्थित रहावे असे आवाहन ध्रुव ग्लोबल स्कूलच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शिरीष प्रभाकर तांबे लिखित 'नेतृत्व' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार,२७ डिसेंबर २०२५ रोजी टिळक रोडवरील मराठी साहित्य परिषदेच्या सभागृहात सायंकाळी 4.30 वाजता आयोजित करण्यात आला आहे. प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, इतिहासकार, समीक्षक श्री सदानंद मोरे आणि दिलीपराज प्रकाशन व प्रकाशक संघाचे अध्यक्ष श्री राजीव बर्वे उपस्थित राहणार आहेत. या पुस्तकाचे प्रकाशन इंदूर येथील श्री सर्वोत्तम प्रकाशन यांनी केले असून हा कार्यक्रम दोन भागात होणार आहे. पहिल्या भागात पुस्तकाचे प्रकाशन होणार असून सूत्रसंचालन श्रीमती नीरजा आपटे करणार आहेत.

# टाकळीढोकेश्वर येथे नाताळ सण उत्साहात साजरा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

टाकळी ढोकेश्वर येथे नाताळ सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला टाकळी ढोकेश्वर येथील न्यू ओपोस्टॉलिक चर्चमध्ये चर्च पास्टर विनोद गायकवाड यांनी नाताळ सना निमित्त उपस्थित सर्वांना ख्रिस्तजन्माचा संदेश दिला यावेळी सर्व ख्रिस्ती बांधव याठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते २४ डिसेंबर रोजी रात्री बारा वाजता ख्रिस्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करून एकमेकांना शुभेच्छा देऊन ख्रिस्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला २५ डिसेंबरला सकाळी साडे दहा वाजता भक्ती घेऊन बायबल वाचन पठण करून पास्टर विनोद गायकवाड , पास्टर दादाभाऊ बागुल ,पास्टर अजय पंडित यांनी सर्वांना ख्रिस्तजन्माचा संदेश दिला. तसेच नाताळ व येणाऱ्या नवीन वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा



देखील या ठिकाणी देण्यात आल्या आहे यावेळी उपस्थित सर्व ख्रिस्ती बांधवांनी देखील नाताळ सणाच्या एकमेकांना शुभेच्छा दिल्या . नाताळ सणानिमित्त चर्चला सजावट करून आकर्षक रोषणाई देखील करण्यात आली होती चर्च सुटल्यानंतर दुपारी गावातील सर्व लोकांसाठी अल्पोपहार व फराळाचे नियोजन करण्यात आले होते . यावेळी एकनाथ साळवे, नितीन काशीकेदार , सुबोध गायकवाड ,प्रमोद गायकवाड, विलास चिकणे, ओम नाईकवाडी,आहेर परिवार,बेलकर परिवार, योहान गायकवाड , इंदुबाई घंगाळे,

संदेश गायकवाड, कुणाल गायकवाड, विराज गायकवाड ,आदेश गायकवाड ,स्वराज गायकवाड,यांच्या सह ख्रिस्ती बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर पास्टर विनोद गायकवाड, पा.अजय पंडित, यांनी सर्वांचे आभार मानले.

# सोशल मीडियावर विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सोशल मीडियावर तरुणीचा फोटो व वैयक्तिक माहितीचा गैरवापर करून तिची बदनामी केल्याप्रकरणी नगर सायबर पोलिसांनी दोन फेसबुक खातेधारकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पीडित तरुणीने सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, संशयित आरोपींनी पीडितेच्या संमतीशिवाय तिच्या नावाचे फेसबुक खाते एका अश्लील चॅटिंग ग्रुपमध्ये परस्पर समाविष्ट केले. या ग्रुपमध्ये आक्षेपार्ह संदेश, छायाचित्रे व चित्रफिती प्रसारित करण्यात आल्या. तसेच पीडितेच्या वैयक्तिक फेसबुक खात्यावरही लज्जास्पद व मानसिक त्रास देणारे संदेश पाठवण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे.

या प्रकारामुळे मानसिक त्रास सहन करावा लागल्याने पीडित तरुणीने सायबर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी संबंधित फेसबुक खातेधारकांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी करीत आहेत. दरम्यान, नागरिकांनी सोशल मीडियाचा वापर करताना वैयक्तिक माहिती शेअर करताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात आले आहे. माळीवाडा बसस्थानक परिसरात बसमध्ये चढत असताना ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सुरक्षितता व सर्वांगीण विकासाच्या जबाबदारीची जाणिव ठेवून कामाला सुरुवात

## नगराध्यक्ष सत्यजित कदम : नगरपरिषदेच्या निवडणूकितील विजयाबद्दल पदयात्रा व विजयी आभार सभा

**देवळाली प्रवरा : (समर्थ गांवकरी)**

देवळाली प्रवरा गाव सुरक्षित ठेवणे आणि गावाचा सर्वांगीण विकास करणे ही मोठी जबाबदारी माझ्यावर तसेच सर्व नगरसेवकांवर आहे. त्या जाणिवेतून कामाला सुरुवात केली आहे. "निवडणुकीचे राजकारण चार दिवसांचे असते; पण त्यानंतर माझे काम म्हणजे समाजकारण. त्यामुळे टीका न करता विरोधकांनी विकासाच्या सूचना कराव्यात, स्टंटबाजीच्या राजकारणाला येथे स्थान नाही," असे प्रतिपादन नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी केले. देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या निवडणुकित भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन केल्याबद्दल विजयी पदयात्रा व त्यानंतर आभार सभा




काल गुरुवारी पार पडली. प्रसंगी नगराध्यक्ष सत्यजित कदम बोलत होते. प्रारंभी देवळाली प्रवरा शहरातून ढोल-ताशांच्या गजरात व गुलालाची उधळण करत भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात आली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आ.चंद्रशेखर कदम होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष मुरलीधर कदम, केरु पटारे, सोसायटीचे चेअरमन मंजाबापू वरखडे, माजी चेअरमन शहाजी कदम, सोपान शेटे, सोपान भांड, बाळासाहेब मुसमाडे, सोपान चव्हाण, नामदेव चव्हाण, अरफान शेख, मुनिर शेख, अजिज शेख उपस्थित होते. प्रास्तविक प्रकाश संसारे यांनी केले. यावेळी प्रीती कदम, सचिन ढुस, दत्तात्रय आढाव आदींनी उपस्थित होते. नगराध्यक्ष कदम पुढे म्हणाले की, गेल्या तीन दिवसापासून शहर स्वच्छतेची मोहीम युद्धपातळीवर सुरू असून गवत काढणे, झुडपे हटवणे या कामांना गती दिली आहे. लोकांच्या विविध समस्या आणि विकाससंदर्भातील मुद्दे प्राधान्याने हाताळले जात आहेत. देवळाली प्रवरात सोसायटी किंवा नगरपालिकेत एकदा सत्ता दिली की पुन्हा परत येत नाही ही धारणा यंदाच्या निवडणुकीच्या निकालांनी खोडून काढली असल्याचेही त्यांनी नमूद केले. स्थानिक जनतेचा प्रबळ पाठिंबा आणि कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांमुळे हा ऐतिहासिक विजय शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. "हा विजय माझा नाही; तर देवळाली प्रवरातील प्रत्येक कार्यकर्ता व समर्थक आणि मतदारांचा आहे," असे कदम यांनी स्पष्ट केले. स्थानिक विकासाची ठोस कामगिरी आणि मिळालेल्या विश्वासाच्या बळावर देवळाली प्रवराचे नाव राज्य व देश पातळीवर पोहोचले आहे. आता शहराला जागतिक पातळीवर नेण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. "देवळालीला जागतिक नकाशावर उभं केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही," असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. देवळाली प्रवरा नगरपरिषदेची आर्थिक स्थिती अतिशय चिंताजनक असल्याचेही नगराध्यक्ष कदम यांनी सांगितले. २०२१ मध्ये पालिकेकडे दीड कोटी रुपयांची ठेव असतानाही, मागील ६–७ महिन्यांपासून केवळ २ हजार रुपयांचेही बिल न दिल्याची माहिती त्यांनी दिली. पालिकेची अवस्था सुधारण्यासाठी गतीने पुढाकार घेतला असून, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण पाटील यांची भेट घेऊन स्ट्रीट लाइट प्रकल्पाच्या मान्यतेसाठी १५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे. शहरातील दुरावस्थेतील प्रकाशयोजना लवकरच मार्गी लागणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पालिका निधी वाढवण्यासाठी आणि थकीत देयकासाठी आवश्यक आर्थिक मदत मागण्यात आली असून, तलाठी कार्यालय, पोलीस स्टेशन, सरकारी दवाखाना अशा विभागांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे.

# पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पद्मपुरी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या घोटाळ्याचा मास्टर माईंड माजी नगरसेवक मनोज लक्ष्मण दुलम व इतर साथीदार याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यास पोलीस प्रशासन हे मोठ्या प्रमाणात टाळाटाळ करीत आहे. पद्मपुरी गृहनिर्माण संस्थेच्या नागरीकांचे निवा-यांचे ठिकाण २२० सभासदांचे प्लॉट बेकायदेशीररित्या विक्री करण्याचा करार या मास्टर माईडने करून हजारो समाजातील लोकांना बेघर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.




शहराच्या मध्यवर्ती भागातील संस्थेचे सुमारे १हे. २०आर जागा अंदाजे ७ कोटी ५० लाख रुपये किंमतीची जागा अगदी ४२ लाख ९० हजार या कवडीमोल भावाने विकण्याचा प्रयत्न करून करोडो रुपयांचा घोटाळा करणा-या व समाजातील लोकांना बेघर करणा-या समाजद्रोही मनोज लक्ष्मण दुलम व इतर यांचे विरुध्द गुन्हा दाखल करणेकामी पद्मपुरी सोसायटी सभासदांनी दि. १९/०६/२०२३ रोजी पोलीस अधिक्षक साहेब, अहिल्यानगर यांचेकडे अर्ज दाखल केलेला होता.

सदर अर्ज हा तोफखाना पोलीस स्टेशन यांचेकडे कारवाई करण्यासाठी पाठविण्यात आला होता. परंतु आजपर्यंत पोलीस प्रशासनाने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही म्हणुन सभासदांनी पुन्हा मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक यांचेकडे दि.०८/१०/२०२५ रोजी अर्ज दिला त्यावेळी देखील मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक साहेबांनी तत्कालीन पोलीस निरीक्षक तोफखाना पोलीस स्टेशन यांना चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याबाबत आदेश दिले होते. असे असताना देखील तोफखाना पोलीस स्टेशन यांचे मार्फत माजी नगरसेवक मनोज लक्ष्मण दुलम याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ होत आहे. माजी नगरसेवक मनोज लक्ष्मण दुलम हा राजकिय पक्षाचा नगरसेवक असल्यामुळे पोलीस प्रशासनावर राजकिय पक्षाचा दबाव असल्यामुळे त्याचे विरुध्द गुन्हा दाखल होत नाही.

समाजातील गोरगरीब कष्टकरी विडी विनकामगार सभासदांचे ४००-४०० स्क्वे. फुटाचे जमीनींचा बेकायदेशीर व्यवहार करुन विडी कामगारांचे फसवणुक केल्याने त्याचे विरुध्द तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावे या मागणी करीता नियोजीत पद्मपुरी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद कुटूंबासह आजपासुन बेमुदत उपोषणासाठी पोलीस अधिक्षक कार्यालय समोर विडी कामगारांचे आमरण उपोषण सुरू आहे.

या उपोषणासाठी विडी कामगार राहुल गाजुल,नरसिंग वडलाकोंडा,अभय बुरुगुल, धनंजय सुंकी, कृष्णा चिट्टयाल योगेश म्याकल, ओंकार रामगिरी, श्रीनिवास वंगार, शंकर कोंडा ,नर्मदा कोंडा, विष्णू बोलली, सत्यभामा हिरावती रमेश बल्लाळ, वैभव अरकल,शंकर वंगार, मोहन चेन्नुर, सुरेश रंगा ,सूर्यकांत श्रीपत, महेश गुरुड, शंकर अन्नलदास, विष्णू दुव्वा,मोहन बौज्जा, संजय आकुबत्तीन, पद्मा कोंडा, अंबादास मादास, पूजा चिट्टयाल ,अनिता अल्ली, रत्नमाला आडेप,स्वाती सब्बन, अनिता गुंडू ,बालमनी कोंडा ,मेघा बोगा, सुजाता कंडेपेल्ली, गुरुदत्त जेटला, गणेश दासर, बालाजी दिकोंडा, विजया दावरशेट्टी ,पद्मा सब्बन , बालमनी एकलदेवी,मन सुनंदा तिरमल राजेंद्र तिरमल, बालाजी कोक्कुल,अशोक एकलदेवी, देवीदास जक्कल आदी उपस्थित होते.

# जामखेडमध्ये कत्तलीसाठी वीस जनावरांची जामखेड पोलीसांनकडुन कारवाई

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड परिसरात कत्तलीसाठी मोठ्या प्रमाणात जनावरांची तस्करी होते. अशा अनेक तक्रारी दाखल होत असतात. जामखेड, खर्डा, खडकत भागात कत्तलखाने आहेत जनावरांची तस्करी सुरू असते. आज गुप्त माहितीच्या आधारे जामखेड पोलीसांनी वीस गोवंश जातीच्या जनावरांची सुटका करत साकत येथील गोशाळेत रवाना केले.सदाफुले वस्ती येथे कंपाऊंड मध्ये कत्तलीसाठी उपासपोटी बांधून ठेवलेल्या वीस जनावरांच्या जवळच कत्तल केलेल्या जनावरांचे हाड मांस शिंगे एक टन अंदाजे आढळून आले पोलीसांनी सर्व ताब्यात घेऊन पंचनामा केला गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरा पर्यंत सुरू होती.



जामखेड पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, जामखेड शहरातील सदाफुले वस्तीवर कत्तलीसाठी उपासपोटी काही जनावरे बांधून ठेवलेली आहेत. अशी माहिती मिळताच कारवाई करत वीस जनावरे व एक टन हाड, मांस, शिंगे आढळून आले.जामखेड शहरातील सदाफुले वस्तीवर कत्तलीसाठी उपासपोटी बांधून ठेवलेली पंधरा जनावरे गोवंश जातीचे गाई, बैल मोठे जनावरे उपासपोटी बांधून ठेवलेली आहेत अशी माहिती मिळताच जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गावडे, पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर बेल्हेकर, दीपक बोराटे, आकाश शेवाळे, योगेश दळवी, गणेश काळाने, पोलीस नाईक सरोदे आदी कर्मचारी होते तसेच जनावरांना साकत येथील श्री साकेश्वर गोशाळेत रवाना केले.

# महाराष्ट्र एसटी कामगार सेनेची कार्यकारिणी जाहीर

## सोपान पालवे यांची अध्यक्षपदी निवड तर सचिवपदी अलीमभाई पठाण



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाची अधिकृत महाराष्ट्र एस टी कामगार सेना पाथर्डी आगार या नोंदणीकृत संघटनेची २०२६ साला करीता निवड प्रक्रिया विभागीय सचिव नितीन येने, अध्यक्ष गणेश फाटक, कार्याध्यश नूर पटेल यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

पाथर्डी आगार कामगार सेना सचिव पदी आगारातील लाडके व्यक्तिमत्त्व अलीम भाई पठाण यांची सलग ७ व्या वेळा निवड करण्यात आली. अध्यक्षपदी नवीन चेहरा सोपान पालवे यांची निवड करण्यात आली व कार्याध्यक्ष पदी आगारातील निष्ठावंत कार्यकर्ते संतोष आंधळे यांची सलग ६ वेळा निवड करण्यात आली. निवड प्रकिया वेळी कामगार सेनेचे जेष्ठ नेते शिवनाथ आंधळे व नारायण मामा कंठाळे यांनी मार्गदर्शन केले.

या संघटनेचे नूतन पदाधिकारी यांचे शिवसेना नेते विष्णूपंत पवार, तालुकाप्रमुख नवनाथराव चव्हाण, युवासेना शहरप्रमुख सचिन नागापुरे, शिक्षक सेना तालुकाप्रमुख नंदकुमार डाळिंबकर सर, मंगेश राठोड, भाऊसाहेब निमसे, लक्ष्मण बडे यांनी अभिनंदन केले.

यावेळी कल्याण गर्जे,राजू उबाळे, अशोक दहिफळे, आदिनाथ बडे संतोष बडे,किरण दहिफळे गणेश गवाने, नितीन जाधव, मच्छिंद्र शेळके, विष्णू पालवे, चंद्रकांत बेळगे, बबन पालवे, आदिनाथ आंधळे, केशव आंधळे व इतर शेकडो कर्मचारी यांनी सदस्य पद स्वीकारून अधिकृत पावती घेतली.

# नरंगलकर व मगरे यांच्यी नियुक्ती

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने नांदेड दक्षिण विभागातील प्रभाग क्रमांक 19 साठी एकनिष्ठ कार्यकर्ते अशोक मगरे व 20 साठी अमृत नरंगलकर यांच्यी नियुक्ती किसन चव्हाण महाराष्ट्र प्रदेश सचिव यांनी नियुक्ती पत्राव्दारे केली आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने नांदेड येथे संस्थापक अध्यक्ष अॅड.बाळासाहेब आंबेडकर यांच्यी पत्रकार परिषद झाल्या नंतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी निवडणूक अनुषंगाने मोठ्या संख्येने इच्छुक उमेदवारांनी भेटीगाठी घेतल्या नंतर महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस किसन कांबळे यांनी एका नियुक्ती पत्राव्दारे नांवां मनपाच्या विस प्रभागासाठी एकनिष्ठ व क्रियाशील पदाधिकारी यांच्यी नियुक्ती केली आहे.

# मांडओहोळ प्रकल्पातून आवर्तन सोडण्याची मागणी

- खासदार नीलेश लंके यांचे पाटबंधारे विभागाला पत्र
- पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर दिलासादायक हालचाल सुरू झाली असून मांडओहोळ मध्यम प्रकल्पातून कालव्याद्वारे आवर्तन सोडण्याची ठोस मागणी करण्यात आली आहे. अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी यासंदर्भात अहिल्यानगर पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र पाठवून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.



तालुक्यातील मांडओहोळ मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी सध्या रब्बी हंगामातील पिकांसाठी पाण्याची तीव्र गरज व्यक्त केली आहे. पाण्याअभावी उभ्या पिकांना धोका निर्माण झाला असून वेळेत आवर्तन न मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांनी शेतकऱ्यांची मागणी शासन दरबारी मांडली आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, मांडओहोळ मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून येत्या दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी आवर्तन सोडण्यात यावे, अशी लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांची एकमुखी मागणी आहे. या आवर्तनामुळे ओलिताखाली येणाऱ्या पीक क्षेत्रास दिलासा मिळेल तसेच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचीही सोय होणार आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलस्रोत आटण्याच्या मार्गावर असून बोअरवेल्स व विहिरींची पाणीपातळी खालावली आहे. अशा परिस्थितीत मांडओहोळ प्रकल्पातून पाणी सोडल्यास शेतीसह घरगुती पाणीपुरवठ्याचा प्रश्न काही प्रमाणात तरी सुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाकडून या मागणीला जोरदार पाठिंबा मिळत आहे.

दरम्यान, पाटबंधारे विभागाने सकारात्मक भूमिका घेतल्यास पारनेर तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून प्रशासनाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वेळेत आवर्तन सुटल्यास शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### कुकडीच्या आवर्तनासाठीही पाठपुरावा

शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन खा लंके यांनी यापूर्वीच जलसंपदा विभागाशी पत्रव्यवहार करून कुकडी डाव्या कालव्यातून आवर्तन सोडण्याची मागणी केली होती, या मागणीची दखल घेऊन कुकडीचे आवर्तन सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांना मिळणार चौपट मोबदला

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य शासनाने नुकताच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. रत्नागिरी – नागपूर महामार्गात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या एका महत्त्वाच्या मागणीला यश आले आहे.



या महामार्गात संपादित होणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यावरून शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होती. महामार्गात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून फारच कमी मोबदला देण्याचा प्रस्ताव होता.

त्यामुळे शेतकऱ्यांच्या माध्यमातून नाराजी व्यक्त करण्यात आली आणि मोबदला वाढवून मिळावा यासाठी त्यांनी पाठपुरावा सुरू केला. दरम्यान शेतकऱ्यांचा हा पाठपुरावा आता यशस्वी झाला आहे.कारण की, राज्य शासनाने नुकताच एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून याअंतर्गत आता अंकली ते चोकाक दरम्यानच्या महामार्गासाठी बाधित शेतकऱ्यांना चौपट दराने नुकसान भरपाई मिळणार आहे. या महत्त्वाच्या निर्णयाला राज्य शासनाने बुधवारी मान्यता दिली असून या निर्णयाची माहिती आमदार डॉक्टर राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्याकडून देण्यात आली आहे. दरम्यान राज्य शासनाच्या या निर्णयाचे शेतकऱ्यांच्या माध्यमातून आता स्वागत केले जात आहे. आधी जो निर्णय झाला होता त्यानुसार या महामार्गात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त दुप्पट दराने नुकसान भरपाई मिळणार होती. दुप्पट दराने शेतकऱ्यांना फक्त ९४ कोटी रुपये एवढी नुकसान भरपाई मिळणार होती. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असते. पण आता राज्य शासन चौपट दराने नुकसान भरपाई देणार आहे म्हणजेच बाधित शेतकऱ्यांना आता १७१ कोटी रुपये मिळणार आहेत. नक्कीच या वाढीव मोबदल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

या महामार्गाच्या इतर सर्व टप्प्यांमधील बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून चौपट दराने मोबदला देण्यात आला होता मात्र अंकली ते चोकाक या सुमारे ३३ किलोमीटर लांबीच्या भागात जेवढे शेतकरी बाधित आहेत त्यांना त्या शेतकऱ्यांपेक्षा कमी मोबदला मंजूर करण्यात आला. या ३३ किलोमीटर लांबीच्या भागात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत त्यांना फक्त दुप्पट दराने मोबदला देण्याचे परिपत्रक शासनाकडून काढण्यात आले होते. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार होते आणि शासनाचे हे दुटप्पी धोरण शेतकऱ्यांना कळत नव्हते. शिवाय शासनाच्या या दुटप्पी वागण्यावरून शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी होती. यामुळे त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू केला. यासाठी शेतकऱ्यांकडून आंदोलन देखील उभारण्यात आले होते.

# कणकवलीत बॅनरवॉर!

**सिंधुदुर्ग : (समर्थ गांवकरी)**

शहरात आता बॅनर वॉर रंगू लागले असून कणकवली नगरपंचायत च्या निवडणुकीच्या अनुषंगाने काल दुपारी नाईक हितचिंतकांकडून उपरोधी टीका करणाऱ्या बॅनरला सावंत - नलावडे समर्थकांनी जोरदार बॅनर द्वारे शेलक्या शब्दात प्रत्युत्तर दिले. कणकवली शहरात फ्लाय ओव्हर ब्रिज खाली दोन ठिकाणी नलावडे - सावंत हितचिंतकांकडून हे बॅनर लागले असून कणकवलीत श्रीधर नाईक चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक या दोन ठिकाणी हे बॅनर लावण्यात आले. यातील एका बॅनर मध्ये "भावाच्या गोट्या काढणाऱ्यांच्या पाठिंब्यावर उभे राहून स्वतःच्या गोट्या वाचवणाऱ्यांनी बोलूच नये" #सावंत नलावडे हितचिंतक. तर दुसऱ्या बॅनर वर "वांझोटेच्या बाळंतपणाला समर्थकांचा लागला" टेस्ट्ट्यूब बेबी.

# श्री श्री १००८ विजय गिरीजी महाराजांच्या आगमनानिमित्त विविध कार्यक्रम

- विविध तालवाद्यांच्या गजरात स्वागत
- महंत योगीराज महाराज रामगडकर यांचे सुश्राव्य कीर्तन+

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मुंगूसवाडे येथील दशनाम संन्यासमठ येथे मंगळवार दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता श्री श्री १००८ सचिव पंचयात महानिर्वाणी आखाडा कणखर हरिद्वार विजय गिरीजी महाराज यांचे माऊली मंदिर संभाजीनगर (मुंगूसवाडे) येथे आगमन होणार आहे. त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



सायंकाळ चार वाजता टाळ- मृदुंग वाद्य, लेझीम, ढोल वाद्यांच्या गजरात विजय गिरीजी महाराज यांची मिरवणूक होऊन त्यांना पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात येणार आहे. तसेच भालदार- चोपदार, पताका यांचे आगमनानिमित्त सुशोभीकरण होईल. बुधवार दि. ३१ डिसेंबर रोजी सकाळी आठ ते नऊ या वेळेत येथील पावन हनुमान मंदिर इनाम येथे ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर यांचे प्रवचन होईल आणि रात्री ९ ते ११ महंत योगीराज महाराज रामगडकर यांचे सुश्राव्य कीर्तन होईल आणि त्यानंतर राम मंदिराचे भूमी पूजन होईल. तरी या सर्व कार्यक्रमास पंचक्रोशीतील भावीक- भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दशनाम संन्यास मठाचे महंत शुक्ल भारती बाबा यांनी केले आहे.

# शेअर मार्केटच्या नावाखाली ७ लाखांची फसवणूक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर दरमहा पाच टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून भिंगार परिसरातील एका तरुणाची तब्बल ७ लाख १० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात प्रशांत गवळी, ज्योती गवळी, प्रकाश मांगपे यांच्यासह पुणे व अहिल्यानगर शहरातील दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०२४ ते जून २०२५ या कालावधीत संशयित आरोपींनी संगनमत करून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा निश्चित परतावा देण्याचे आमिष दाखवले. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून रोख रक्कम, ऑनलाइन व्यवहार तसेच आरटीजीएसद्वारे लाखो रुपये स्वीकारले. मात्र, गुंतवणुकीची मुदत संपल्यानंतरही ना परतावा देण्यात आला, ना मुद्दल रक्कम परत करण्यात आली.

### दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित तरुणाने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मुलगीर करत आहेत. दरम्यान, नागरिकांनी शेअर मार्केटमधील अवास्तव परताव्याच्या आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा!

## वडाळ्यात खो-खो चा जल्लोष; उपउपांत्य फेरीचे चित्र स्पष्ट!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

वडाळ्यातील शारीरिक शिक्षण मंडळाच्या मैदानावर सुरू असलेल्या ३९ व्या किशोर–किशोरी (सब ज्युनिअर) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेने दुसऱ्या दिवशी कमालीची रंगत पकडली. प्रत्येक सामन्यात वेग, चपळता, अचूक रणनीती आणि जिद्दीचा उत्कट आविष्कार पाहायला मिळाला. किशोर व किशोरी गटात धाराशिव, मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली आणि सातारा या संघांनी दमदार कामगिरी करत उपउपांत्य (बाद) फेरीत प्रवेश केला.

मुंबईचा परभणीवर एका गुणाने थरारक विजय (किशोर गट)




यजमान मुंबईने परभणीविरुद्ध झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात २६–२५ (मध्यंतर १४–११) असा अवघ्या एका गुणाने विजय मिळवला. मुंबईकडून यश जाधव, अधिराज गुरव, रुद्रसिंग चव्हाण व आरुष तांबे यांनी सलग ओळीत उत्कृष्ट संरक्षण व आक्रमण करत संघाला निर्णायक यश मिळवून दिले. परभणीच्या खेळाडूंनी शेवटपर्यंत दिलेली झुंज कौतुकास्पद ठरली.

मुंबई उपनगरचा हिंगोलीवर एकतर्फी धडाका (किशोर गट)

मुंबई उपनगर संघाने हिंगोलीवर ३२–०५ (मध्यंतर २७–०) असा दणदणीत विजय मिळवत एक डाव राखून २७ गुणांनी सामना जिंकला. हर्षद शिर्के आणि प्रज्योत गुजर यांनी अप्रतिम खेळ साकारत सामना पूर्णतः आपल्या बाजूने वळवला.

धाराशिवची बीडवर ठसठशीत सरशी (किशोर गट)

धाराशिव संघाने बीडवर २८–१० असा विजय मिळवत एक डाव राखून १८ गुणांची आघाडी घेतली. प्रफुल वसावे, सुरज काकडे व ओम पवार यांच्या प्रभावी कामगिरीमुळे धाराशिवने वर्चस्व सिद्ध केले.

किशोरी गटात अटीतटीचे सामने:

किशोरी गटात लातूरने छत्रपती संभाजीनगरवर २६–२४ असा अटीतटीचा विजय मिळवला. पिछाडीवरून सावरत लातूरने दुसऱ्या डावात खेळ उंचावला. जालना संघाने नांदेडवर ३१–२४ असा ७ गुणांनी संयमी विजय नोंदवला.

संक्षिप्त निकाल : किशोर गट: रायगडने लातूरचा ३१–१९ असा पराभव केला; नंदुरबारने सिंधुदुर्गवर ४१–०८ असा एक डाव राखून विजय मिळवला; रत्नागिरीने धुळ्याचा २६–१७ असा पराभव केला; अहिल्यानगरने नांदेडवर २९–१३ असा एक डाव राखून सरशी मिळवली.

किशोरी गट: नंदुरबारने रायगडचा ४८–२० असा पराभव केला; अहिल्यानगरने सिंधुदुर्गचा ४४–०२ असा धुव्वा उडवला; बीडने मुंबई उपनगरवर ३०–२४ असा विजय मिळवला.

उद्घाटन सोहळ्यात प्रेरणादायी विचार : स्पर्धेचे उद्घाटन पेडणेकर ज्वेलर्सचे आनंद पेडणेकर आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त उदय देशपांडे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी १४ वर्षांखालील वयोगटातील स्पर्धा भारतीय खेळाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे सांगितले. कार्यक्रमास स्पर्धा समिती अध्यक्ष संदीप तावडे, मुंबई खो-खो संघटनेचे अध्यक्ष अॅड. अरुण देशमुख, प्रमुख कार्यवाह सुरेंद्र विश्वकर्मा, पंच मंडळ सहसचिव नानासाहेब झांबरे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार शिवछत्रपती पुरस्कार विजेते पराग आंबेकर यांनी मानले. प्रारंभी २४ जिल्ह्यांतील ४८ संघांच्या ७५० खेळाडूंनी भव्य संचलन केले.

उपउपांत्यपूर्व सामने :

मुले: धाराशिव–पालघर, नंदुरबार–रत्नागिरी, रायगड–सातारा, पुणे–मुंबई उपनगर, सांगली–नाशिक, जालना–ठाणे, मुंबई–अहिल्यानगर, सोलापूर–छत्रपती संभाजीनगर.

मुली: सोलापूर–अहिल्यानगर, ठाणे–मुंबई, सांगली–जळगाव, परभणी–सातारा, नंदुरबार–धाराशिव, लातूर–पुणे, बीड–जालना, नाशिक–नांदेड.

# शालेय विद्यार्थ्यांनी घेतला पारंपारिक यात्रेचा प्रत्यक्ष अनुभव

नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)

शालेय विद्यार्थ्यांना माळेगावच्या पारंपारिक यात्रेचे दर्शन घडावे तसेच यात्रेचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या सहली काढण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला जिल्ह्यातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमांतर्गत लोहा, कंधार, अर्धापूर, नांदेडसह इतर तालुक्यांतील एकूण 33 शाळांच्या सहली माळेगाव यात्रेत सहभागी झाल्या. या सहलींमधून



जवळपास साडेपाचशे विद्यार्थ्यांनी माळेगाव यात्रेची पाहणी करून तिचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

माळेगाव यात्रेच्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर व शिक्षणाधिकारी नियोजन दिलीप बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांनी एक समिती स्थापन केली होती.

या समितीत अध्यक्ष म्हणून विस्तार अधिकारी डी. आर. शिंदे, तसेच केंद्रप्रमुख एम. बी. सोनकांबळे, डी. व्ही. मोहिते, केंद्रीय मुख्याध्यापक व्ही. जी. गायकवाड, जी. एन. धुळगंडे, जी. एस. उप्परवाड यांचा समावेश होता. याशिवाय या समितीत एकूण 18 सहशिक्षक सहभागी होते. समितीतील सर्व सदस्यांनी यात्रेत आलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत करून शालेय शिक्षणाशी संबंधित विविध उपक्रम तसेच शैक्षणिक स्टॉल्सची माहिती दिली. विद्यार्थ्यांना माळेगाव यात्रेची सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष यात्रास्थळी फिरवून मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह स्पष्टपणे दिसून आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही माळेगाव यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. पालकांसोबत आलेल्या सुमारे दीड ते दोन लाख मुला-मुलींनी देखील माळेगावची यात्रा अनुभवली तसेच येथील शैक्षणिक प्रदर्शनाला भेट दिली.



पुणे : केएडब्ल्यू व्हेलोस मोटर्स प्रा. लि. (केव्हीएमपीएल) अंतर्गत कार्यरत असलेल्या मोटोहाऊसने कृष्णा मोटो यांच्या सहकार्याने पुण्यात आपली नवीन डीलरशिप सुरू केल्याची घोषणा केली आहे. या विस्तारामुळे भारतात दर्जेदार मोटरसायकल, पेट्रोल स्कूटर आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी सोल्युशन्स ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या मोटोहाऊसच्या उद्दिष्टाला आणखी बळ मिळाले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### श्रीगोंदा : नाताळ सणानिमित्त पीटर रणसिंग यांचा सन्मान

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा येथील दिव्यांग संघटनेच्या वतीने नाताळ सणाचे औचित्य साधून भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते सामाजिक कार्यकर्ते पीटर रणसिंग यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते पोपटराव आंबा खेतमाळीस, नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सोमनाथ देवकाते, उपाध्यक्ष शिराज शेख, उपाध्यक्ष बाळासाहेब पिपडा, गणेश कळसकर, भालेराव, प्रताप आल्हाट, बाबा घोडके, कोकाटे, नाना कोळपे, दीपचंद वायदंडे, मोटे व पिंपळे यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी पीटर रणसिंग यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. दिव्यांगांच्या हक्कांसाठी तसेच समाजहितासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांचा हा सन्मान करण्यात आल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यावेळी उपस्थितांनी एकमेकांना नाताळ सणाच्या शुभेच्छा देत सामाजिक सलोखा व एकोप्याचा संदेश दिला. जर हवे असल्यास याचे थोडक्यात वृत्त, मथळ्याचे पर्याय किंवा छायाचित्र कॅप्शन देखील तयार करून देऊ शकतो.




### साहेबजादे शहादात दिवसानिमित्त गुरुद्वारा बोर्डतर्फे सद्भावना रॅलीचे आयोजन

नांदेड (स. गांवकरी) : साहेबजादे शहादात दिवसानिमित्त गुरुद्वारा बोर्ड तर्फे सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .रॅलीच्या माध्यमातून समाजात एकोपा, शांतता आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.अमरजीत सिंघ कुंजीवाले यांच्या तर्फे उपक्रमादरम्यान गुरुद्वारा गेट. नं. २ येथे विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आवश्यक पॅडचे वाटप करण्यात आले.शिक्षणाला प्रोत्साहन देत, विद्यार्थ्यांच्या भविष्याला आधार देणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला. वीर बालकांच्या बलिदानाची आठवण जपत समाजहित व सद्भावना जपण्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला. उपस्थिती डॉ. सचिन संभाजी पाटील उमरेकर (नांदेड दक्षिण विधानसभा प्रमुख),शितल खंडील,राज यादव, मनप्रीत सिंघ कुंजीवाले, परमवीर सिंघ मल्होत्रा, कुलप्रकाश सिंघ लिखारी सज्जन सिंघ सिद्धू ,हरजीत सिंघ चुग, नरेंद्र सिंघ लिखारी ,राजा सिंघ फौजी,देवींदर सिंघ गल्लीवाले ,दुलिंदर सिंघ संधू , सुरजीत सिंघ तबेलेवाले ,महेल सिंघ लांगरी, केर सिंघ नालेवाले, अजित सिंघ बुंगई,जसवंत सिंघ शाहू, बचितर सिंघ सुखमणी, मनप्रीत सिंघ कारागीर, बलजीत सिंघ शाह,जसबीर सिंघ धुपीया, हरप्रीत सिंघ हॉटेलवाले, सरबजीत सिंघ हॉटेलवाले, सुरजीत सिंघ कारपेंटर, हरप्रीत सिंघ पुजारी,अमरप्रीत सिंघ हंडी, व इतर मान्यवर उपस्थित होते.

### स्वारातीम विद्यापीठात वीर बाल दिवस साजरा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.२६ डिसेंबर, २०२५ रोजी वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते वीर बालकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ.प्रकाश निहलानी, तसेच डॉ. अर्चना साबळे, डॉ. हनमंत फडेवार, डॉ. सतीशकुमार मेकेवाड, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहा. कुलसचिव रवी मोहरीर यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांनी वीर बालकांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



# अंदर बाहार खेळणाऱ्या १२ जुगाऱ्यांना रंगेहाथ पकडले

नायगाव : (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील तलबीड शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर नायगाव पोलिसांनी अचानक धाड टाकत अंदर–बाहेर जुगार खेळणाऱ्या १२ जुगाऱ्यांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत १ लाख ८ हजार ८०० रुपयांची रोख रक्कम, ९ मोबाईल फोन व ५ मोटारसायकलींसह एकूण ६ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई दि. २५ डिसेंबर रोजी सायंकाळी करण्यात आली. तर आज दि.२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रानसुगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर व्यंकटराव जाधव यांच्या तलबीडजवळील शेतात मोकळ्या जागेत जुगार अड्डा सुरू असल्याची गोपनीय माहिती बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांना मिळताच पोलिसांनी तातडीने



पथक तयार करून दोन पंचांच्या उपस्थितीत नियोजनबद्ध धाड टाकली. धाडीवेळी अविनाश प्रकाश माचनवाड (रा. हंगरगा, ता. उमरी), शंकर गणपती देवडे (इतवारा, नांदेड), हनुमंत गंगाधर वानखेडे (रा. सावरखेड), नागोराव आनंदा गायकवाड (रा. सावरखेड), संजय शंकर बाणेवाड (रा. घुंगराळा) व गणेश बालाजी पवळे (रा. कोपरा, ता. नायगाव) शेख खादीर दस्तगीर (रा. घुंगराळा), गणपती गोविंदराव जाधव (रा. सुगाव), भगवान गणपती ढगे (रा. सावरखेड), माधव कोंडीबा सुगावे (रा. घुंगराळा), साईनाथ बाबू गायकवाड (रा. सावरखेड), माणिका बळी वानखेडे (रा. सावरखेड) हे १२ जण जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन व दुचाकी असा मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणी पोलीस कर्मचारी बालाजी बळवंतराव शिंदे यांच्या फिर्यादीवरून नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या धाडशी कारवाईत बिलोलीचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर, पोउपनि गजानन तोटेवाड, पोउपनि सुरज तिडके, पो.हे कॉ. मुद्देमवार, भगवान कोतापल्ले, सुदाम जाकोरे, पो.कॉ गजानन चापलकर, विनोद भंडारे, गाजुलवार, अंभोरे, ममताबादे, बालाजी शिंदे उपस्थित होते.

या कारवाईमुळे तालुक्यात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यांना जोरदार धक्का बसला असून पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे जुगार चालकांचे धाबे दणाणले आहेत.



प्रभाग 1 क दिपाली नितिन बारस्कर (राष्ट्रवादी काँग्रेस) यांनी उमेदवारी अर्ज भरला (छाया- उदय जोशी)




ठाणे : आनंद कल्याणकारी सामाजिक संस्थेतर्फे विशेष लक्षवेधी दिवाळी अंक २०२५ चा अक्षरआनंद पुरस्कार साप्ताहिक ठाणे नागरिकचे संपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्ष श्री सतिशकुमार भावे यांना देण्यात आला. (फोटो - संतोष पडवळ )

# अखेर खचलेल्या पूलाचे पुनर्जन्म होणार

तामसा : (समर्थ गांवकरी)

तामसा ते कांडली (हदगांव रोड )ला जाण्यासाठी वायपणा (बु.)या गावाजवळील मुख्य रस्त्यावरील मोठ्या नाल्यावर नवीन पूल बांधण्याच्या कामासाठी राज्याच्या हिवाळी अधिवेशनात तब्बल ७. ५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे. या पुलास भरीव असा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदारबाबुरावकदमकोहळीकर च्या पाठपुरावाला यश मिळाला. स्वातंत्र्य काळापासून निर्माण झालेल्या हा पूल मागील दोन वर्षांपासून तुटलेल्या असून कोणत्याही लोकप्रतिनिधी नी पाठपुरावा केला नाही @विशेष बाब हा तुटलेलं पूल माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील यांच्या वायपणा(बु )गावात आहे. या पुलाच्या बांधकामामुळे वायपणा बु., येवली व कांडली परिसरातील इतर गावांतील नागरिकांना ये-जा करण्यासाठी मोठा दिलासा मिळणार असून, पावसाळ्यात होणाऱ्या अडचणी कायमस्वरूपी दूर होणार आहेत. आतापर्यंत या



- आमदार बाबुराव कोहलीकर च्या पाठपुरावा ल्या यश
- तामसा कांडली (रेल्वे स्टेशन )च्या मुख्यरस्त्याचे पुलाच्या निर्माण साठी साडेसात कोटीचे निधी मंजूर.

नाल्यावर खचून गेलेल्या पुलामुळे पावसाळ्यात रस्ता बंद होणे, शालेय विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. नवीन पुलाच्या बांधकामामुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होणार असून, दळणवळण व्यवस्था अधिक मजबूत होईल. यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळणार असून, नागरिकांच्या सुरक्षिततेतही वाढ होणार आहे.

# अकोले शाळेच्या पुनर्निर्माणात 'खारीचा वाटा' उचलल्याचे समाधान – डॉ. लहामटे

अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पुनर्निर्माण कार्यात खारीचा वाटा उचलता आला, ही समाधानाची आणि निर्मितीचा आनंद देणारी बाब असल्याचे मत अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी व्यक्त केले. या शाळेतील वर्गखोल्यांची दुरुस्ती तसेच स्वच्छतागृहांच्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला असून, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची उभारणी करण्यासाठी आगामी काळात ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. अकोले येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये स्वच्छतागृहाच्या बांधकामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शरद चौधरी, ज्येष्ठ पत्रकार व माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर, शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर, शहराध्यक्ष पराग वाडगे, डॉ. मनोज मोरे, शालेय व्यवस्थापन




समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे, कैलास वैद्य, इस्माईलखान पठाण, केंद्रप्रमुख विजय भांगरे, नगरसेवक आरिफ तांबोळी, अर्शद तांबोळी आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार डॉ. लहामटे यांनी सांगितले की, त्यांच्या आमदारकीच्या काळात शिक्षण, रस्ते आणि आरोग्य या विषयांना प्राधान्य देण्यात आले आहे. शिक्षणातूनच देशाचा सर्वांगीण विकास शक्य असून, प्राथमिक शाळा हा शिक्षणाचा पाया असल्याने येथे दर्जेदार, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्राथमिक स्तरावर मजबूत शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी सक्षम बनून स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो. त्यामुळे शिक्षकांची जबाबदारी अधिक महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. दिवंगत भास्करराव कदम गुरुजी यांनी अकोले जिल्हा परिषद शाळेच्या कॅम्पसमध्ये पूर्व प्राथमिक शाळा (प्री-स्कूल) सुरू करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

पत्रकार प्रकाश टाकळकर यांनी शाळेच्या मूळ इमारतीच्या स्थापत्य शैलीला धक्का न लावता तिचे जतन व संवर्धन करण्याची सूचना मांडली, त्यास आमदारांनी सहमती दर्शविली. अकोले शाळेच्या पटसंख्येत वाढ होण्यात भास्करराव कदम गुरुजी प्री-स्कूलचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार महोदयांभोवती चिमुकल्यांनी गराडा घातला. त्यांचा हातात हात घेण्यासाठी जणू मुलांमध्ये स्पर्धा लागली होती. आमदार डॉ. लहामटे यांनी पुढील कार्यक्रमाला जायचे असतानाही घाई न करता सर्व विद्यार्थ्यांच्या हातात हात मिळवला. फोटो घेतले. भूमिपूजन प्रसंगी चिमुकल्या दोन मुलींच्या हातात नारळ देत ते वाढवण्यास सांगितले. बराच वेळ ते मुलांमध्ये रमले होते. सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण विद्यार्थ्यांनी डॉ. लहामटे यांना दिले त्यांनीही लगेचच ते स्वीकारले. "आपण सारे भारतीय आहोत. हे कधीही विसरू नका." असा मोलाचा संदेश त्यांनी मुलांना दिला. लहान मुलांना भेटून निराळी ऊर्जा मिळते अशी भावना त्यांनी व्यक्त करत शाळेतील विद्यार्थ्यांचा निरोप घेतला.

# मराठवाड्याच्या शैक्षणिक क्रांतीचे जनक - विनायकराव पाटील

(समर्थ गांवकरी)

**मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, अध्यक्ष कै. विनायकराव पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान म्हणजे मराठवाड्याच्या विकासाला दिलेली चालना होय. अशा या विनायकरावांच्या दि. २८ डिसेंबर रोजी स्मृतीदिनानिमित्त....**

मराठवाडा मागासलेला असल्यची खंत विनायकरावांच्या मनात सतत सलत होती. विकासापासून कोसो दूर असलेल्या मराठवाड्याचा विकास करायचा असेल तर अज्ञानाचा अंधकार नाहीसा केला पाहिजे. हे अण्णांनी ओळखले. ते स्वतः शिक्षकी पेशातले असल्यामुळे शिक्षणातील अडथळे कोणते याची



त्यांना जाणीव होती. अण्णांचे कायद्याचे शिक्षण विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात झाल्यामुळे छत्रपती शाहु, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, कर्मवीर भाऊराव पाटील, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील या शिक्षणप्रेमींचा चांगलाच प्रभाव त्यांच्यावर पडला होता. मोजक्याच ठिकाणी शिक्षणाच्या सुविधा असल्यामुळे मराठवाड्यातील अनेक गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित होती. शिक्षणापासून दूर असलेल्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून मराठवाड्यातील अज्ञानाची पाळेमुळे शोधून काढली आणि छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित शिक्षण संस्थेतील शिक्षकाच्या नोकरीचा त्याग करून शिक्षणाचा प्रसार सुरू केला.

आपल्या भारतीय संस्कृतीत त्यागाला फार महत्व आहे त्यागाची भावना मनात रुजविणे ही त्यागाची वृत्ती आहे. निस्वार्थीपणाची भावना अवघ्या महाराष्ट्रातल्या माणसात छत्रपती शिवाजी महाराजांपासून जोपासलेली आहे. त्याग, दान, माणुसकी हा तर मराठी मातीचा आत्मा आहे. याच दृष्टीकोनातून विनायक अण्णांचा हेवा वाटतो. मराठवाड्यात जर विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरे प्रभावी साधन नाही. याच जाणीवेतून दादासाहेब सावंत, बाळासाहेब पवार, रामचंद्र पाटील, मधुकर मुळे, भानुदास चव्हाण, बाबुराव काळे, शेख अहमद शेख चाँद, रामराव आवरगावकर यांच्यासारख्या अनेक विश्वासू सहकाऱ्यांना सोबत घेवून विनायकराव पाटील यांनी स्वतःच्या जन्म दिवसाचे औचित्य साधून १ सप्टेंबर १९५८ रोजी 'मराठवाडा शिक्षण प्रसार मंडळ' या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली आणि मराठवाड्यात ज्ञानज्योत पेटविली. विनायक अण्णांनी १९५८ मध्ये लावलेल्या या छोट्याशा ज्ञानरुपी रोपट्याचे आज विशाल वृक्षात रुपांतर झाले असून त्या वृक्षाच्या फांद्या छत्रपती संभाजीनगरसह परभणी, बीड, जालना, हिंगोली या जिल्ह्यातही पसरल्या असून शिक्षणापासून वंचित असणारी लाखो गोर-गरीबांची मुले या महाकाय ज्ञानरुपी वृक्षाखाली बसुन ज्ञानाची गोड फळे चाखताना बघायला मिळत आहेत. विचारशैली आणि वकृत्व ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीचा समोरच्या व्यक्तीवर लवकर प्रभाव पडतो. हे तत्त्व विनायकरावांच्या बाबतीत तंतोतंत लागु होते. त्यांच्याकडे हे गुण असल्यामुळे 'मराठवाडा विभागीय दारुबंदीचे अध्यक्ष पद त्यांच्याकडे चालून आले आणि तिथून त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. दारुबंदीचे अध्यक्ष झाल्यानंतर अण्णांनी संपूर्ण मराठवाड्यात जनजागृती मोहीम सुरू केली. दारुमुळे उद्ध्वस्त झालेले अनेकांचे संसार नव्याने उभे केले. त्यामुळे जनमाणसांत अण्णांची चांगली प्रतिमा निर्माण झाली. जनसामान्यांतला परिस म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले. सर्वसामान्य माणुस विनायकरावांच्या चळवळीत ओढला गेला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# प्रेमाची किंमत रक्ताने चुकवावी लागली

## कथित प्रतिष्ठेसाठी भोकरच्या जावेदची पुण्यात निर्घृण हत्या

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

"प्रेमाला जात, धर्म, पंथ किंवा वयाचे बंधन नसते" — हे वाक्य आपण कित्येकदा ऐकतो. मात्र प्रत्यक्षात, तथाकथित मानवी समाज म्हणून विकसित झाल्याचा दावा करणाऱ्या याच युगात, भिन्न जाती-धर्मातील दोन जीवांमध्ये नैसर्गिकरित्या फुललेले प्रेम अजूनही अनेकांना सहन होत नाही. आणि त्या असहिष्णुतेतून जन्म घेतो तो क्रौर्याचा भीषण आविष्कार.

नागराज मंजुळे यांच्या 'सैराट' चित्रपटात दाखवलेले वास्तव हे केवळ चित्रपटापुरते मर्यादित न राहता, आज भारतीय समाजात अधिकच गडद होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. नांदेड जिल्ह्यात चार महिन्यांपूर्वी लखन भंडारे, मागील महिन्यात सक्षम ताटे आणि आता २२ डिसेंबर रोजी भोकर येथील जावेद पठाणची निर्घृण हत्या — ही केवळ त्याच मानसिकतेची भीषण साखळी आहे.

शांत वस्ती हादरली

भोकर शहरातील शांत, सभ्य नागरिकांची वस्ती म्हणून ओळख असलेल्या शहीद प्रफुल्ल नगर परिसरात राहणाऱ्या पठाण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. पठाण कुटुंबातील तरुण जावेद खाजा मिया पठाण याची, त्याच्या उच्चशिक्षित प्रेयसीच्या भावाने पुणे येथे २२ डिसेंबर २०२५ रोजी निर्घृण हत्या केली. या घटनेने संपूर्ण प्रफुल्ल नगर हादरून गेले आहे.

मयत जावेदचे वडील खाजामियाँ पठाण हे सायकलवरून आईस्क्रीम-बर्फी विक्री व भंगार गोळा करून कुटुंबाची उपजीविका भागवत होते. त्यांना तीन मुले व तीन मुली अशी सहा अपत्ये. जावेद हे त्यातील सर्वात लहान. पक्षाघाताने अपंग झालेले वडील आणि आईसोबत जावेद प्रफुल्ल नगरात राहत होता. कष्ट, जबाबदाऱ्या आणि साधेपणात वाढलेला हा तरुण, कोणत्याही गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर होता.

सुमारे तीस वर्षांपूर्वी पठाण कुटुंबाचे प्रफुल्ल नगरातील भुरके कुटुंबीयांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. धर्म व चालीरीती वेगळ्या असल्या तरी, परस्पर विश्वास, सहकार्य आणि सुख-दुःखातील सहभागामुळे ही नाती इतकी घट्ट झाली होती की, जणू दोन नव्हे तर एकच कुटुंब. सण-उत्सव, कौटुंबिक कार्यक्रम, एकमेकांकडे राहणे-जेवणे हे सर्व नेहमीचेच होते.





याच जिव्हाळ्यातून, नकळत जावेद आणि भुरके कुटुंबातील तरुणीमध्ये प्रेम फुलले. महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या त्या तरुणीला जावेद कधीमधी मोटारसायकलवर कॉलेजपर्यंत सोडत असे. हळूहळू दोघांचे नाते अधिक घट्ट झाले. मात्र हे प्रेमच अखेर त्याच्या मृत्यूचे कारण ठरले.

२१ डिसेंबर रोजी नगरपरिषद निवडणुकीचे मतदान आटोपल्यानंतर, जावेद 'कामावर जातो' असे सांगून घराबाहेर पडला. त्याने प्रेयसीसह थेट पुणे गाठले. तेथे बहिणीची ओळख असल्याने परिसर परिचित होता. दोघांनी भाड्याने खोली घेतली आणि जावेद वॉशिंग सेंटरमध्ये कामास लागला.

दरम्यान, दोघे पुण्यात गेल्याचे समजताच तिच्या कुटुंबियांचा राग प्रचंड अनावर झाला. त्यांनी त्याच्या कुटुंबियांकडे चौकशी केली. मात्र हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. आणि मग त्या तरुणीचा भाऊ संदीप आणि त्याचा मित्र ओंकार पुण्यात पोहोचले. परिसराची माहिती असल्याने त्यांनी थेट जावेदच्या कामाचे ठिकाण गाठले.

काम आटोपून घरी परतण्याच्या तयारीत असलेल्या, बेसावध जावेदला संपविण्यासाठी दडून बसलेल्या दोघांनी थोडे बाजूला घेतलं संदीपने लोखंडी हत्याराने जावेदच्या डोक्यात सपासप वार केले.

### ससून रुग्णालयातच घेतला अखेरचा श्वास

जखमी जावेदचा जीव वाचवण्यासाठी प्रथम तातडीने नजीकच्या दवाखान्यात, त्यानंतर ससून रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र प्रचंड रक्तस्त्रावामुळे तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. २३ डिसेंबर रोजी शवविच्छेदनानंतर २४ डिसेंबरला भोकर येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### आईचा हंबरडा आणि न्यायाची मागणी

नऊ महिने पोटात वाढवलेलं, जन्म दिलेलं पोर... आपल्याच अवतीभवती,आपल्याच मुलांसोबत लहानाचं मोठं झालेल्या संदीपने निर्दयीपणे संपवल्याने तिच्या काळजावर प्रचंड मोठा आघात झाला आहे. सदरील प्रकरणी शेख रौफ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आंबेगाव पोलीसात आरोपी विरुद्ध विविध कलमानखाली गुन्हे दाखल करण्यात आले असून त्या दोघांनाही त्यांनी भोकर येथून ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. आता पोलीस तपास करतील आणि न्यायालयीन प्रक्रियेत तो सिद्ध झाल्यास आरोपींना शिक्षा होईलही. परंतु अशा प्रकरणांमुळे मानवी समाज संवेदनहीन झालाय का? असा प्रश्न पडत आहे. दरम्यान, आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा देऊन न्याय द्यावा, अशी मागणी मयत जावेदच्या कुटुंबीयांनी केली आहे.

# प्रकाश महाजन शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

अडीच वर्ष महाराष्ट्रात जातीयवादाचा वणवा पेटलेला असताना तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तो कुशलतेने हाताळला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून हजारो रुग्णांना रोगमुक्त करण्याचे काम शिंदे यांनी कोणताही गाजावाजा न करता शांततेत केले. हा त्यांचा मोठेपणा आहे. शिंदे यांनी केलेलं काम लोक विसरणार नाहीत, अशा शब्दांत ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांनी शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री शिंदे यांचे कौतुक केले. हिंदुत्वाविषयी जागरुक असलेले शिंदे कडवे हिंदुत्ववादी नेते आहेत, असे महाजन म्हणाले.

ठाणे येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत महाजन यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. महाजन पुढे म्हणाले की, हिंदुत्वावर काम करण्याची इच्छा असल्याने आज शिवसेनेत प्रवेश केला. महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री झाले जे घरात बसून राहिले, परीक्षेला बसले नाहीत पण पहिले आले, मात्र एकनाथ शिंदे याला अपवाद ठरले. ते परीक्षेला पण बसले आणि पहिले आले, अशा शब्दांत महाजन यांनी शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाचे कौतुक केले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून बरे झालेल्या रुग्णांनी शिंदे यांना आभार पत्रं पाठवली, त्या पत्रांच वजन १०० किलो आहे, असं दृश्य आजवर कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला दाखवलं नाही. मात्र याचा कुठेही शिंदे यांनी गाजावाजा केला नाही हा त्यांचा मोठेपणा आहे.

# नवोन्मेष आणि महत्त्वाकांक्षाचा संगम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

क्रेडिट इंडिया या आघाडीच्या ग्राहक वित्त कंपनीने आज आपल्या पहिल्या एआय-संचालित कॅम्पेन-#SapnoKaNayaSaalच्या शुभारंभाची घोषणा केली. ब्रँडच्या विचारांचा विस्तार, #ZindagiHit! आशा-अपेक्षांनी भरलेल्या भविष्याची सुरुवात करताना मागील वर्ष प्रतिबिंबित करणारी फिल्म विकसित करण्यासाठी एआरएम वर्ल्डवाइडशी एकत्रीकरण करून होम क्रेडिट इंडियासाठी हे कॅम्पेन नवोन्मेषाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. हा सिनेमा ब्रँडला एक तंत्रज्ञान-अग्रेसर, विश्वासार्ह सक्षमकर्ता म्हणून स्थान देतो, जो देशभरातील, कधीही, कुठेही ग्राहकांच्या विविध आकांक्षांना पाठिंबा देण्यास तयार आहे.

# नित्य अन्नछत्र सेवेच्या १० वर्षपूर्तीनिमित्त वस्त्रदान व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

शहरातील सामाजिक, धार्मिक तसेच आपत्ती व संकटाच्या काळात नागरिकांसाठी अहोरात्र झटणारे सच्चिदानंद पवार गुरुस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली चालविण्यात येणाऱ्या नित्य अन्नछत्र या सेवेला येत्या 31 डिसेंबर रोजी 10 वर्षे पूर्ण होत आहेत. या सेवाच्या दशकपूर्तीनिमित्त गरजू नागरिकांना तसेच नित्य अन्नछत्र संकल्पनेतील लाभार्थ्यांना वस्त्रदान करण्यात येणार असल्याची माहिती पवार गुरुस्वामी यांनी दिली आहे.

नित्य अन्नछत्र ही संकल्पना शहरातील निराधार, अत्यंत गरीब, अपंग, मानसिक व दृष्टिहीन तसेच वृद्ध नागरिकांपर्यंत थेट त्यांच्या निवासस्थानी दररोज अन्न पोहोचवणारी एक आगळीवेगळी व माणुसकीची सेवा आहे. संबंधित लाभार्थ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष शहानिशा करून, कोणताही गाजावाजा न करता ही सेवा



गेल्या दहा वर्षांपासून अखंड, निस्वार्थ व सेवाभावाने सुरू आहे.

थंडी, ऊन, वारा, पाऊस अशा सर्व प्रतिकूल परिस्थितींचा सामना करत सच्चिदानंद पवार गुरुस्वामी यांनी ही सेवा निरंतर सुरू ठेवली आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळातसुद्धा ही अन्नसेवा एकही दिवस खंडित न होता सुरू होती, हे विशेष उल्लेखनीय आहे. त्यामुळे शहरवासीयांमध्ये या सेवेबद्दल मोठा आदर व विश्वास निर्माण झाला असून, लोकसहकार्याच्या माध्यमातून ही सेवा आजही नियमितपणे सुरू आहे.

दरम्यान, दि ३१ डिसेंबर रोजी रात्री लोककल्याणार्थ नर्मदेश्वर महादेव साई मंदिर संस्थान येथे भव्य पडी पूजा, अन्नदान तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा लाभ परिसरातील भाविकांनी व अभंग भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. दरवर्षी अय्यप्पा स्वामींची दीक्षा घेणाऱ्या भाविकांची शहरात मोठी संख्या असते. दीक्षा कालावधीत अन्नदान, वस्त्रदान, नामस्मरण, पूजापाठ यांना विशेष महत्त्व असते. याच भावनेतून ३१डिसेंबर रोजी इतर करमणुकीच्या कार्यक्रमांऐवजी धार्मिक व सेवाभावी उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे. नववर्षाचे स्वागत सेवा, सद्भावना व धार्मिक आचरणातून व्हावे, तसेच अशा उपक्रमांमुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# विद्यार्थ्यांना शिक्षणा बरोबरच व्यवहारीक ज्ञानाची गरज

## माजी मंत्री पाचपुते

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**




विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवहारीक ज्ञानाची गरज असल्याचे राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी केले आहे ते श्रीगोंदा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या बाल आनंदी बाजार व आधुनिक डिजिटल लॅब, ग्रंथालयचे उद्घाटन प्रसंगी पाचपुते बोलत होते. पाचपुते यांनी यावेळी सांगितले की मुख्याध्यापक आबासाहेब जगताप यांनी शाळेचा बदलेला चेहरा मोहरा बाल आनंदी बाजार पाहून आपण थकीत झालो असे ही पाचपुते यांनी सांगितले.

या कार्यक्रमात अहिल्या नगर जिल्ह्य परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांची विद्यार्थींनी घेतलेली मुलाखत याच मुलाखतीत दिलेली उत्तरे ऐकून विद्यार्थी, ग्रामस्थ अगदी भारावून गेले.

पाटील यांनी विद्यार्थी दक्षेत असताना जे शिक्षणाधिकारी बनण्याचे स्वप्न साक्षात साकार करून दाखविले हे ऐकताच सर्वांनी टाळ्या वाजवून पाटील यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी,शिक्षणविस्तारधिकारी निलकंठ बोरुडे,माजी शिक्षणविस्तारधिकारी सिताराम भुजबळ,श्री स्वामी समर्थ ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था काष्टीचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब कोल्हटकर,सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानदेव खरात,माजी जिल्हा परिषद आढळगाव गट सदस्या पंचशिलाताई गिरमकर, आनंदवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच छाया ढमढेरे, उपसरपंच विठ्ठल गिरमकर,माजी उपसरपंच रमेश गिरमकर, मंगल जाधव, मातोश्री रुग्णालयाचे डॉ.नवनाथ लाड शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपतराव खरात, सुनिल खरात,दरेकर मॅडम, केंद्र प्रमुख हनुमंत भूकन, नवभारत माध्यमिक विद्यालय आनंदवाडीचे मुख्याध्यापक सुनिल गिरमकर, अंगणवाडी सेविका सुनिता भोसले,सिमा पाचपुते आदि मान्यवर उपस्थित होते.

> "अगदी लहान असलेल्या गणेशवाडी जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक आबासाहेब जगताप यांनी योग्य नियोजन करून अगदी बाजाराचे स्वरूप नव्हे तर यात्रेचे स्वरूप आणले होते यात जंपिंग जपान,मुकमिकी मांऊस,खेळणीची दुकाने,प्रमुख पाहुणे यांचे स्वागत करण्यासाठी चक्क दोन उंट होते.शाळा स्थापन झाल्या पासून हा पहिलाच भव्य दिव्य कार्यक्रम होता.
>
> **- एक ग्रामस्थ गणेशवाडी**

# "मर्दिनी" चित्रपटाचा मुहूर्त शॉट संपन्न ! २०२६ मध्ये प्रदर्शित !!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शुभारंभाच्या मंगल क्षणी, श्री स्वामी समर्थ आणि गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने आगामी मराठी चित्रपट 'मर्दिनी' चा मुहूर्त शॉट पार पडला. या प्रसंगाने चित्रपटाच्या निर्मिती प्रवासाला अधिकृत सुरुवात झाली असून, दमदार विषय आणि प्रभावी मांडणी घेऊन 'मर्दिनी' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज होत आहे. श्रेयस तळपदे आणि ॲफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. प्रस्तुत या चित्रपटाची कथा मनोरंजनाच्या पलीकडे, प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याची, सहनशक्तीची आणि शक्तीची गाथा उलगडते. या चित्रपटात सुंदर आणि चमकदार कलाकारांचा संगम आहे, ज्यांच्या कामगिरीमुळे कथा अधिक प्रभावी आणि आठवणींमध्ये राहणारी बनेल.

# कापूस गादी बनविण्याचा व्यावसायिक गाळा जळून खाक

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिनांक २६/१२/२०२५ रोजी दुपारी १२ : ४२ वाजताच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे प्राप्त झालेल्या घटनेच्या माहितीनुसार साई श्रद्धा चाळ, सुजाता हॉटेल जवळ, धर्मवीर नगर, दिवा-आगासन रोड, दिवा (पूर्व) ठाणे या ठिकाणी साई श्रद्धा चाळ, चाळ क्रमांक- १५, या ठिकाणी गाळा क्रमांक- ०१ (मालक - पलटण प्रजापती) या १० X २० फूट दुकान गाळ्याला आग लागली होती. सदर घटनास्थळी दिवा पोलीस कर्मचारी, टोरेंट पॉवर विद्युत कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०१-फायर वाहनासह, ०१- रेस्क्यू वाहनासह उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत झालेली नाही. सदर दुकान गाळ्यामध्ये एक कर्मचारी काम करत होता, आग लागता सदर कर्मचारी सुरक्षित बाहेर आला होता. सदर दुकान



गाळ्यामध्ये असलेल्या गादी, कापूस, व गादी बनविण्याची मशीन इतर साहित्याला आग लागून नुकसान झाले. तसेच सदर लागलेल्या आगीमुळे गाळ्याच्या छतावरील सिमेंट पत्रे फुटून खाली पडल्याने गाळ्याचे नुकसान झाले आहे. सदर घटनास्थळी दुकान गाळ्याला लागलेली आग अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने दुपारी १ वाजताच्या सुमारास पूर्णपणे विझविण्यात आली असून परिस्थिती नियंत्रणात आणली.

# भारत काकडे यांची नांदेड तालुका प्रतिनिधी म्हणून नियुक्ती

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात असलेल्या ऐतिहासिक किल्ले वाफगाव येथे संपन्न होणाऱ्या श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर प्रथम यांच्या राज्याभिषेक महोत्सवासाठी नांदेड जिल्हा तालुका प्रतिनिधी म्हणून नांदेड तालुक्यातील सक्रिय सामाजिक कार्यकर्ते भारत काकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर यांच्या स्वाक्षरीच्या अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे करण्यात आली असून, राज्याभिषेक महोत्सवाचे नियोजन अधिक व्यापक आणि प्रभावी व्हावे, या उद्देशाने समितीने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी प्रतिनिधींची निवड केली आहे. होळकर घराण्याच्या गौरवशाली परंपरेतील व राज्यातील अत्यंत



सन्मानाच्या या ऐतिहासिक सोहळ्यासाठी भारत काकडे यांची निवड झाल्याने नांदेड जिल्ह्यात तसेच नांदेड तालुक्यात आनंद व्यक्त केला जात आहे. सामाजिक, सहकार व सार्वजनिक जीवनात त्यांचा सक्रिय सहभाग लक्षात घेता ही नियुक्ती योग्य असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# कला मानवी जीवन प्रगल्भ बनवते - कांतीलाल कोथिंबीरे

- संतांची मांदियाळी अवतरली महादजी शिंदे विद्यालयात !
- 'धुरंधर' सांस्कृतिक सोहळ्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवे पंख

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**




रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयात शैक्षणिक वर्ष 2025–26 च्या निमित्ताने वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम 'महादजी चे धुरंधर' मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत रंगतदार वातावरणात संपन्न झाला. ज्ञान, संस्कार आणि कलागुणांचा सुरेख संगम साधणाऱ्या या कार्यक्रमामुळे संपूर्ण विद्यालय परिसर आनंद, अभिमान आणि प्रेरणेने भारावून गेला.

कार्यक्रमाच्या सकाळच्या सत्रात पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. या समारंभाचे अध्यक्षस्थान रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य माननीय बाबासाहेब भोस यांनी भूषविले, तर सेवानिवृत्त उपाधीक्षक कांतीलाल कोथिंबीरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कला, क्रीडा, स्काऊट, गुरुकुल विभागातील विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शाळेच्या शैक्षणिक प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या गुणवंत शिक्षकांनाही यावेळी गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कांतीलाल कोथिंबीरे म्हणाले, "आपल्या मनातली उमेद जपली पाहिजे. त्या उमेदेच्या बळावरच आपण पुढचे पाऊल उचलू शकतो. मेहनत, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा संगमच यशाकडे नेतो." त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

सांस्कृतिक कार्यक्रम उद्घाटन पर मनोगत व्यक्त करताना कला मानवी जीवन प्रगल्भ बनवते असे प्रतिपादन कांतीलाल कोथिंबीरे( सेवानिवृत्त पोलिस अधिक्षक) यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी दोन्ही सत्रात प्रमुख मान्यवर म्हणून सुजित रायकर, रवीशेट दंडनाईक,नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस, अलका अनभुले,चांदणीताई खेतमाळीस, राजेंद्र खेडकर, मीराताई शिंदे, मनिषा आनंदकर, मुकुंद सोनटक्के आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब भोस यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले, "प्रत्येक विद्यार्थ्याने आपली कला जपली पाहिजे. उपजत गुणांना योग्य व्यासपीठ मिळाले, तर विद्यार्थी जीवनातच नव्हे तर समाजातही आपली ओळख निर्माण करू शकतो." कार्यक्रमाची सुरुवात भक्तीमय गीत 'तुज मागतो मी आता' व 'देवा श्री गणेशा' या नृत्याने झाली. त्यानंतर 'एक भारत श्रेष्ठ भारत' या नाटकातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. लोकनृत्य, देशभक्तीपर नृत्य, भक्तिगीते, सामाजिक प्रबोधनपर नाटके, भारूड, कव्वाली तसेच कराटे प्रात्यक्षिके अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने केले.

'मोबाईल व्यसन', 'पाणी हरवले' यांसारख्या प्रयोगांतून विद्यार्थ्यांनी आजच्या सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भाष्य केले. 'भीमा कोरेगाव', 'छावा' यांसारख्या नृत्यप्रकारांतून इतिहासातील शौर्यगाथा सादर करण्यात आली. लोककलेचा ठसा उमटवणारी 'माऊली माऊली', 'दिसला ग बाई दिसला', 'चंद्रा' यांसारखी सादरीकरणे विशेष लक्षवेधी ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक सचिन झगडे यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमामध्ये बहार आणली.

कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# 'अमेरिकन ड्रीम'ला H-1B व्हिसाचे नख

मायक्रोसॉफ्ट, ॲपल व गुगल यांनी त्यांच्या इंटर्नल मेमोमध्ये लिहिलंय - 'कोणी भारतीय या डिसेंबरमध्ये H-1B किंवा अन्य काही व्हिसा स्टॅम्पिंगसाठी भारतात जाणार असेल तर त्यांनी अमेरिकेबाहेर प्रवास टाळावाच!' H-1B स्टॅम्प करून घ्यायला भारतात आलेल्या माझ्या ओळखीच्या काही (सुदैवी) जणांना मार्च किंवा एप्रिल २०२६ची स्टॅम्पिंग डेट मिळालेली आहे. पण बऱ्याच जणांना थेट जानेवारी/फेब्रुवारी २०२७ ची डेट आहे आणि काहींना तर डेट कधी मिळेल, हेच माहिती नाही. भारतात H-1B व्हिसा हा एक कौटुंबिक प्रकल्प असतो. अर्जदार एकटा; पण त्याच्यासोबत त्याचे आई-वडील, मामा-मामी, काका-काकू, शेजारी आणि व्हॉट्सॲप कुटुंब गट सगळेच 'process'मध्ये असतात. H-1B मुलाखत ठरलेली असते, घरात उत्साहाचे वातावरण असते आणि मग अचानक एक ई-मेल येतो: Your H-1B visa interview has been postponed/cancelled. घरात शांतता पसरते. कोणालाही अधिकृत कारण माहीत नसतं; पण प्रत्येकाकडे स्वतःचा, पण ठाम अंदाज असतो. मग व्हिसा-होतकरू उमेदवारांना फोनवरून सल्ले सुरू होतात..'आता फेसबुक डिलीटच कर!'...'व्हॉट्सॲपवर गुड मॉर्निंग सोडून काहीही टाकू नकोस.' गेल्या काही वर्षांत अमेरिकेच्या H-1B व्हिसा प्रक्रियेत मोठे बदल झाले आहेत. विशेषतः भारतातील H-1B व्हिसा मुलाखती वारंवार पुढे ढकलल्या जाणे किंवा अचानक रद्द

## संपादकीय



होणे ही एक गंभीर समस्या बनली आहे. यामागे केवळ प्रशासकीय कारणे नसून, अमेरिकेच्या इमिग्रेशन विभागाकडून (USCIS व State Department) करण्यात येणाऱ्या सोशल मीडिया तपासण्यांचा वाढता वापर हे एक महत्त्वाचे कारण आहे. या प्रक्रियेचा परिणाम केवळ उमेदवारांपुरता मर्यादित न राहता त्यांच्या कुटुंबीयांवर आणि सामाजिक आयुष्यावरही खोलवर होत आहे. अमेरिकन इमिग्रेशन धोरणानुसार, H-1B तसेच इतर नॉन-इमिग्रंट व्हिसा अर्जदारांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्ट्स, कमेंट्स, लाइक्स आणि शेअर्स यांचा अभ्यास केला जातो. राष्ट्रीय सुरक्षा, इमिग्रेशन फसवणूक, चुकीची माहिती किंवा अमेरिकाविरोधी विधानांचा संशय असल्यास मुलाखत झाल्यानंतरही व्हिसा निर्णय लांबतो किंवा आधीच ठरलेली मुलाखत रद्द होते. ही अनिश्चितता मानसिक तणाव वाढवणारी ठरते. भारतातील बहुतांश H-1B उमेदवार मध्यमवर्गीय किंवा उच्च मध्यमवर्गीय कुटुंबांतून येतात. अमेरिकेत नोकरी मिळाल्यानंतर अनेक कुटुंबांनी आधीच मोठे निर्णय घेतलेले असतात- घर विकणे, मुलांची शाळा बदलणे, कर्ज घेणे, जोडीदाराने नोकरी सोडणे. अशावेळी व्हिसा मुलाखत रद्द झाली किंवा पुढे ढकलली गेली, तर संपूर्ण कुटुंबाचे नियोजन कोलमडते.व्हिसा रि-स्टॅम्पिंगच्या तारखा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या गेल्याने त्यासाठी भारतात आलेले अमेरिकन नोकरदार आता इकडेच अडकले आहेत. अनेकांची कुटुंबे-मुले-कर्जाने घेतलेली घरे तिकडे आणि हे इकडे अशी फाटाफूट झाली आहे. व्हिसा रि-स्टॅम्पिंगचे घोंगडे भिजत पडले, तर हातात असलेली नोकरी टिकेल का, याचीही शाश्वती नाही. या सगळ्या प्रक्रियेचा एक दीर्घकालीन परिणाम म्हणजे अस्थिरतेची भावना. करिअर, कुटुंब आणि स्थलांतर यांचे निर्णय आता अधिक जोखमीचे वाटू लागले आहेत. अमेरिका स्थलांतराबाबत कूस टाकते आहे यात शंकाच नाही! या धोरण-बदलामागे 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (MAGA) याच्याशी संलग्न असे निश्चित धोरण आहे आहे! पूर्वी H-1B व्हिसाचे वाटप लॉटरी पद्धतीने होत असे. दरवर्षाला दिल्या जाणाऱ्या ८५,००० H-1B व्हिसा पैकी तीनचतुर्थांश भारतीयांच्या वाट्याला येत. आता नव्या धोरणात डोनाल्ड ट्रम्प सरकारने ही लॉटरी पद्धत रद्दबातल ठरवली आहे. आता विशेष कौशल्ये असलेले (हाय स्किल्ड) आणि ज्यांना मोठ्या पगाराच्या नोकऱ्या देण्यास अमेरिकन कंपन्या तयार आहेत असेच उमेदवार अमेरिका 'निवडून' घेईल.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | 2 | | 3 | 5 | | 1 |
| | 6 | 9 | 7 | | | 8 | | |
| | 3 | 5 | | 4 | | | 9 | |
| 4 | | | | | 7 | | | 9 |
| | | 8 | | | | 4 | | |
| 3 | | | 9 | | | | | 6 |
| | 9 | | | 2 | | 3 | 5 | |
| | | 3 | | | 9 | 6 | 1 | |
| 5 | | 1 | 3 | | 6 | 9 | | 4 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेंन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 9 | 4 | 8 | 1 | 7 | 6 | 3 |
| 3 | 6 | 1 | 7 | 5 | 9 | 2 | 8 | 4 |
| 4 | 7 | 8 | 3 | 6 | 2 | 5 | 1 | 9 |
| 1 | 3 | 7 | 8 | 2 | 4 | 9 | 5 | 6 |
| 6 | 2 | 4 | 5 | 9 | 7 | 1 | 3 | 8 |
| 9 | 8 | 5 | 6 | 1 | 3 | 4 | 2 | 7 |
| 8 | 9 | 3 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 1 |
| 5 | 4 | 6 | 1 | 7 | 8 | 3 | 9 | 2 |
| 7 | 1 | 2 | 9 | 3 | 6 | 8 | 4 | 5 |

### पंचांग

२७डिसेंबर२०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
पौष शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- पौष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:सप्तमी १३:१०:०९
नक्षत्र:पूर्वाभाद्रपद

०९:०९:२५
योग:व्यतीपात
१२:२१:०७
करण:वणिज १३:१०:०९
करण:विष्टि २४:३९:३७+
सूर्य:धनु

## उपदेशाचे डोस

### रामकृष्णांची परीक्षा

रामकृष्ण परमहंस हे अगदी शुद्ध मनाचे सत्पुरुष होते. त्यांना कशाचाही मोह नव्हता की आसक्ती नव्हती. पैशाला तर ते स्पर्शही करीत नसत त्यामुळे शिष्यांच्या मनात त्यांच्याविषयी आदर होता पण तरीही ते सांगत, 'गुरुविषयी आंधळी श्रद्धा मनात ठेवू नये. सावकार प्रत्येक नाणं खणखण वाजवून खरं आहे की नाही हे तपासून घेतो. तसंच आपण गुरु खरा आहे की खोटा हे तपासून घ्यावं.' एकदा नरेंद्राने त्यांची अशी परीक्षा घ्यायचे ठरवले. ते स्नानाला गेलेले असताना त्याने त्यांच्या बैठकीखाली रुपयाचे एक नाणे ठेवून दिले. थोड्या वेळाने रामकृष्ण परत आले आणि बैठकीवर बसले पण बसता क्षणी जणू एखादा विंचू चावावा तसे ताडकन् उठले. बैठकीची चादर बाजूला करून त्यांनी पाहिले तो तेथे रुपया ठेवलेला. त्यांना फार धक्का बसला आणि ते अस्वस्थ झाले. 'कुणी ठेवला हा रुपया येथे?' त्यांनी विचारले. नरेंद्र जवळच उभा होता. त्याने रामकृष्णांची क्षमा मागितली आणि म्हणाला, 'आपल्या मनात पैशाविषयीची आसक्ती अजिबात नाही, असं आपण नेहमी म्हणता. आपली तशी परीक्षा घ्यावी म्हणून मीच हा रुपया ठेवला होता. क्षमा करा मला!' रामकृष्ण म्हणाले, 'क्षमा कशाला मागतोस? तू काहीही चूक केली नाहीस. गुरुला गुरु म्हणून स्वीकारण्यापूर्वी त्याची अशी परीक्षा अवश्य घेतली पाहिजे. आपली निष्ठा अशीच सत्यावर असली पाहिजे. गुरुच्या शब्दांवर नाही! या घटनेमुळे रामकृष्णांचे नरेंद्रावरचे प्रेम वाढीला लागले आणि नरेंद्राची गुरुनिष्ठाही!

कथा उपदेश : आपण गुरू निवडताना तो खरा आहे की खोटा हे तपासून घ्यावे.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८३१- चार्ल्स बीगस् हा जहाजावरून पृथ्वी प्रदक्षिणेस निघाला. या प्रवासातील त्याच्या निरीक्षण नोंदींवरून त्याने उत्क्रातीवाद मांडला.
- १९४५- आंतराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेची स्थापना.
- १९७५- चासनाला येथील कोळशाच्या खाणीत पाणी शिरून २७१ कामगारांचा मृत्यू.

### राष्ट्रीय

- १९३६- जळगाव जिल्ह्यातील फैजपूर काँग्रसची सुरुवात.
- २००१- खास न्यायालयाने कोळसा आयात प्रकरणातून जयललिता व इतर नऊ जणांची निर्दोष मुक्तता केली.
- २००४- बांगलादेशाचा पराभव करून भारताने एकदिवसीय मलिका २-१ अशी जिंकली.
- २००६- उत्तर प्रदेशात जीपने १७ जणांना चिरडले.
- २००६- तामिळनाडुत बस नदीत कोसळून ७ ठार.
- २००८ - आमिर खान अभिनीत आणि दिग्दर्शित 'तारे जमीं पर' आणि नीरज पांडेच्या 'ए वेडन्सडे' या चित्रपटाला व्ही. शांताराम पुरस्कार मिळाला.

### जन्म

- १७५१- खगोलशास्त्रज्ञ योहानेस केप्लरचा जन्म.
- १७९६- मिर्झा गालिब यांचा जन्म.
- १८९८- कृषी व शिक्षणतज्ज्ञ पंजाबराव देशमुख यांचा जन्म.
- १९२३- पु. भागवत यांचा जन्म
- १९२२- सूक्ष्मजंतू शास्त्रज्ञ लुई पाश्चर यांचा जन्म.

### निधन

- १८३३- राजा राममोहन राय यांचे निधन.
- १८३४- चार्ल् लँब या इंग्रज साहित्यिक व कवीचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६५



**आडवे शब्द**

१.साक्षरतासाठी चालवले जाणारे एक अभियान
६.लोकमान्य टिळकांचा एक प्रसिध्द ग्रंथ
९.वाळु,माती
१०.क्रिकेटमधील धाव
११.आई,जननी
१२.कर्ता,करविणारा
१४.हिंदीत घर
१५.अर्धवर्तुळाकार आकार, १६.न समजण्याजोगे,आकलन होणार नाही असे
१८.जहाल विरूध्द
२०.अस उलटे करा
२२.ज्याच्यात जीव आहे असा
२४.पंख
२५.नाही म्हणने
२७.दाहेव उलटे करा
२९.भगवा चे व काढुन दा लावा
३१.धास्ती,धाकाची भिती
३३.शिवसैनिक
३४.एक प्रेमी युगल राजाराणी
३६.रोगपरिक्षा
३७.नवरदेव
३८.मासा,एक रास
४०.लायक नसलेला
४२.रसाने भरलेला
४४.तडजोड,व्यवस्था
४७.पवन,वात
४८.कपाळ,ललाट
५०.मर्त्य,मयत
५१.................. वार्ता विघ्नाची,श्रीगणेश आरतीची सुरूवात
५६.राजपुत्र,युवराज
५८.निघालेला,मार्गस्थ
५९.पावसाची वाट पाहणारा एक पक्षी
६०.अर्ध्या ओंजळीचे माप
६२.कामासह
६४.गडावरील पहारेकरी
६५.भुतकाळातला, गेलेल्या काळाचा
६९.दाबुन टाकण्याजोगे
७१.तुल्य,सारखा
७३.मऊ धोरणाचा
७४.निकाल,निवाडा
७५.विवाहासाठी जमलेली मंडळी
७७.इंग्रजीतला विजेता
७८.सरळ,थेट
८०.नाडी,तपकीर
८१.जंगल,वन,अरण्य
८३.आलमारी
८४.पाठीमागचे दार
८५.एकदम शांतता,स्तब्धता

**उभे शब्द**

१.संगीतातील सात स्वर
२.घाव,जखम
३.नक्षत्र,चांदणी
४.एक गोड व आंबट फळ
५.याचना करणारा
६.हिंदुचा एक पवित्र ग्रंथ
७.कॉलम,खाना
८.प्रतिबंध,मना
११.मानलेला
१३.राजाची बायको
१४.घाण,कचरा
१६.बदनामी,नामुष्की
१७.मुरलीधराची आई
१९.संपत्तीचा हक्कदार
२१.सतत,अखंड
२३.आयुष्य,पाणी म्हणजे ....
२६.कावळयाचा रंग
२८.नवरा,पती
२९.प्रलयंकारी, अवाढव्य
३०.चाल,वेग
३२.लोखंड घासण्याचे साधन
३३.आईची बहीण
३५.मेलेला,मर्त्य
३९.चित्ताकर्षणासाठी केलेला हावभाव
४१.सनी देओल,अमिषा पटेल यांचा एक वादग्रस्त चित्रपट
४३.र्तांजर उलटे करा
४५.हिंदीत तुम्ही
४६.दानव,राक्षस
४७.खबर,बातमी
४८.भाग देणारा
४९.कुल उलटे
५२.दुध आटवुन तयार होणारा एक पदार्थ
५३.पाठीचे मुख्य हाड
५४.शोक,व्यथा
५५.जड नसलेला
५६.रात्री उमलणारे एक फुलझाड
५७.पाठीचे मुख्य हाड,कना
६०.लोखंडाला स्पर्षाने सोने करणारा काल्पनिक दगड
६१.हिंदीत कळी
६३.सहाय्यक,मदत करणारा
६५.हिंदीत दुख,डिंक
६६.पोळया भाजण्याचे साधन
६७.काळया पाठीचे हरीण
६८.पलंग विणण्याची कापडी पटटी
७०.मुसलमान
७२.मोठेपणा,महती
७६.पतन,पडणे
७९.दाट उलटे करा
८१.एक छोटे चार चाकी वाहन,जीप
८२.नविन,नवा

### शब्दकोडे क्र. ६४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.साक्षरता अभियान ६.गीता रहस्य ९.रेती १०.रन ११.माता १२.कार १४.मकान १५.कमान १६.अनाकलनीय १८.मवाळ २०.सअ २२.सजीव २४.पर २५.नकार २७.वहेदा २९.भगदा ३१.धसका ३३.मावळा ३४.नल दमयंती ३६.निदान ३७.वर ३८.मीन ४०.नालायक ४२.रसरशीत ४४.तरतुद ४७.वारा ४८.भाल ५०.मर ५१.सुखकर्ता दुखहर्ता ५६.राजकुमार ५८.रवाना ५९.चातक ६०.पसा ६२.सकाम ६४.गडकरी ६५.गतकालीन ६९.दमणीय ७१.सम ७३.मवाळ ७४.वासलात ७५.वहाड ७७.विनर ७८.नीट ८०.नस ८१.कानन ८३.कपाट ८४.परसदार ८५.निरवता

उभे शब्द : १.सारेगामपधनी २.क्षती ३.तारका ४.अननस ५.याचक ६.गीता ७.रकाना ८.हरकत ११.मानस १३.राणी १४.मळ १६.अवहेलना १७.यशोदा १९.वारसदार २१.अनवरत २३.जीवन २६.काळा २८.दादला २९.भयंकर ३०.गती ३२.कानस ३३. मावशी ३५.मयत ३९.नखरा ४१.गदर ४३.रजर्ता ४५.तुम ४६.असुर ४७.वार्ता ४८.भाजक ४९.लकु ५२.खवा ५३.कना ५४.दुख ५५.हलका ५६.रातराणी ५७.माकडहाड ६०.परीस ६१.कली ६३.मदतनीस ६५.गम ६६.तवा ६७.काळवीट ६८.नवार ७०.यवन ७२.महानता ७६.-हास ७९.टदा ८१.कार ८२.नव

# संयुक्त विद्यमाने स्वयंरोजगार मेळावा व साहित्य वाटप





ठाणे : (समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय मोदी सेवा समिती (RMSS), विश्वधर्म अपंग मानव सेवा समिती, आर्या बहुउद्देशीय सेवा संस्था व जनमैत्री का फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंरोजगार मेळावा व साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम एन.के. टी.बँक्वेट हॉल, एन.के.टी. कॉलेज ठाणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास थोर समाजसेवक नानजीभाई

## गरजू कुटुंबांना रोजगाराची नवी दिशा!

खिमजीभाई ठक्कर, उद्योगपती संदीपभाई मेहता, दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर (मालाड), फिरोजभाई आर. पटेल, विकासजी यंदुवंशी, महेंद्रजी त्रिवेदी, बाळाजी सूर्यवंशी, डॉ. विनय गोविलकर, किशोर लखन आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना नानजीभाई खिमजीभाई ठक्कर म्हणाले की, "स्वरोजगार हे केवळ आर्थिक स्वावलंबनाचे साधन नसून आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. 'स्वतःच्या पायावर उभे राहणे' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी असे उपक्रम समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. या मेळाव्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना रोजगाराची नवी दिशा मिळणार आहे." याप्रसंगी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, "मानव धर्म हीच खरी सेवा आहे या तत्त्वावर आधारित राहून आमच्या संस्था समाजातील दुर्बल, गरजू व मागास घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. साहित्य वाटपातून तात्काळ मदत मिळते, तर स्वरोजगारातून लाभार्थ्यांचे भविष्य अधिक सुरक्षित होते." तसेच चंद्रकांत महाराज डुंबरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "आज येथे मिळणारे साहित्य व मार्गदर्शन ही केवळ मदत नसून एक नवी सुरुवात आहे. मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्य ठेवल्यास यश निश्चित आहे." कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक व सहकार्य करणाऱ्या दानशूर व्यक्तींचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. अशाच सामाजिक उपक्रमांतून सक्षम, स्वावलंबी आणि सशक्त भारताची उभारणी होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# प्रा भानुदास बेरड यांच्या गंध मातीचा या ग्रंथास जिल्हा मराठाचा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार

अकोले : (समर्थ गांवकरी)



भाजपा नगर जिल्ह्याचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध लेखक प्रा भानुदास बेरड यांच्या गंध मातीचा या ग्रंथास जिल्हा मराठा चा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर येथे न्यू आर्ट्स कॉलेज च्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या 142 व्या हुतात्मा दिनानिमित्त अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार च्या वतीने राज्यस्तरीय "छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार प्रदान सोहळा" येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ९९वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन नागपूर चे अध्यक्ष श्री प्रेमानंद गजवी यांच्या हस्ते व संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे विश्वासराव आठरे पाटील, मुकेश मुळे, ॲड दीपलक्ष्मी मसे, श्री दीपक दरे, न्यूयॉर्कचे प्राचार्य दीपक सागडे, निवड समितीचे निमंत्रक प्रा गणेश भगत, प्रा मेघा ताई काळे, न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. एम.तांबे, प्रा चंदनशिवे, प्रा मच्छिंद्र मालुंजकर, प्राचार्य रामदास टेकाळे आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील आठ साहित्यिकांना पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये प्रा भानुदास बेरड यांनी लिहिलेल्या "गंध मातीचा" या ललित लेख संग्रह ग्रंथास हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. सन्मान चिन्ह, मानपत्र, ग्रंथ, शाल व पुष्पगुच्छ, दहा हजार रुपये पुरस्कार राशी असे पुरस्काराचे स्वरूप होते. प्रा भानुदास बेरड हे ललित लेखक असून वर्तमान पत्रात अनेक लेख प्रसिद्ध झाले आहे. तसेच भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य असून नगर जिल्हा भाजपा चे माजी जिल्हाध्यक्ष आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# निलेश राणे–रवींद्र चव्हाण भेटीने राजकीय खळबळ!

- निवडणुकीनंतर पुन्हा तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्याच्या माळा!

सिंधुदुर्ग जिल्हा : (समर्थ गांवकरी)



कणकवली नगरपंचायत निवडणुकीच्या काळात आमदार निलेश राणे यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्यावर जाहीर आरोप केले होते. त्या पार्श्वभूमीवर दोघेही एकमेकांचे राजकीय वैरी असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, आज मुंबईतील रवींद्र चव्हाण यांच्या निवासस्थानी निलेश राणे यांनी घेतलेल्या सदिच्छा भेटीने राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

निवडणूक काळातील आरोप–प्रत्यारोप, टोकाची भूमिका आणि उघड मतभेद लक्षात घेता ही भेट अत्यंत अनपेक्षित मानली जात आहे. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, निवडणूक काळातील आरोपांवर पडदा पडला का, की पक्षातील अंतर्गत समीकरणांमध्ये काही मोठा बदल होणार आहे—असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

ही भेट केवळ औपचारिक सदिच्छा आहे की भविष्यातील राजकीय समेटाचा संकेत, याबाबत दोन्ही नेत्यांकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र आरोपांनंतर थेट भेट झाल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

# राजधानीत वीर बाल दिवसानिमित्त अभिवादन

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

शिखांचे दहावे गुरु गोबिंदसिंग यांचे सुपुत्र बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या अतुलनीय शौर्याचे व बलिदानाचे प्रतीक असलेल्या वीर बाल दिवसानिमित्त कॉपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, संचालक (माहिती) हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे तसेच महाराष्ट्र सदन व परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्याचा परीक्षा हक्क हिरावला

- विद्यार्थ्यांनी कुलगुरूंची प्रत्यक्ष भेट घेऊन तक्रार मांडली
- कोरे प्रवेशपत्र देण्याचा गंभीर प्रकार उघड
- प्रशासकीय गोंधळामुळे शैक्षणिक नुकसान
- कुलगुरूंसमोर विद्यार्थ्यांची व्यथा; चौकशीची मागणी"

वसमत : (समर्थ गांवकरी)



नांदेड येथील मॉडर्न संगणक विज्ञान व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयातील गंभीर प्रशासकीय निष्काळजीपणामुळे संगणक विज्ञान विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या एका विद्यार्थ्याला परीक्षेपासून वंचित राहावे लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी विद्यार्थ्यांनी थेट स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूंची प्रत्यक्ष भेट घेऊन तक्रार मांडल्याने प्रकरणाला गांभीर्य प्राप्त झाले आहे.वसमत (जि. हिंगोली) येथील रहिवासी सिद्धीकी सुमेर हा विद्यार्थी सदर महाविद्यालयात संगणक विज्ञान विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहे. त्याने दिनांक ६ मार्च २०२५ रोजी उन्हाळी सत्राच्या परीक्षेसाठी डिझाईन अँड ॲनॅलिसिस ऑफ अल्गोरिदम या विषयाचा परीक्षा अर्ज प्रत्यक्ष पद्धतीने योग्यरीत्या भरून परीक्षा शुल्कही जमा केले होते. मात्र, विषय नमूद असतानाही महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याला कोणताही विषय नमूद नसलेले कोरे प्रवेशपत्र देण्यात आले. ही बाब तात्काळ महाविद्यालय विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. तथापि, वेळेत दुरुस्ती न झाल्याने विद्यार्थ्याला संबंधित परीक्षा देता आली नाही. या प्रकारामुळे त्याचे शैक्षणिक नुकसान झाले असून मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे विद्यार्थ्याने नमूद केले आहे. यानंतर विद्यार्थ्याने दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी जुन्या अभ्यासक्रमानुसार पुन्हा परीक्षा अर्ज सादर केला. मात्र, यावेळीही प्रशासकीय समन्वयाअभावी नव्या अभ्यासक्रमानुसार इतर विषयांचे प्रवेशपत्र देण्यात आले. विशेष म्हणजे, मूळ विषयाचा प्रवेशपत्रावर पुन्हा एकदा उल्लेख नसल्याचे स्पष्ट झाले. या सततच्या प्रशासकीय चुकांमुळे विद्यार्थ्याचा परीक्षा हक्क हिरावला गेल्याचा आरोप करत संबंधित विद्यार्थ्यांनी परीक्षा विभाग, महाविद्यालय प्रशासन व उच्च शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय तसेच आवश्यक असल्यास कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# वाहतूक कोंडी सोडवा - तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

कळवण : (समर्थ गांवकरी)



शहरातील न्याती कॉर्नर मेन रोड ते तलाठी कॉलनी पर्यंत राहणाऱ्या वाहतूक कोंडी योग्य नियोजन करण्याबाबत कळवण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने कळवण नगरपंचायतचे मुख्याधिकारी नागेश येवले यांना शिवसेना कळवण शहरप्रमुख अजय पगार यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. कळवण शहर शिवसेनेतर्फे देण्यात नगरपंचायतीला निवेदनात म्हटले आहे की, कळवण शहराच्या नेहमी वर्दळीच्या ठिकाणी रोज होत असलेल्या वाहतूक कोंडी मुळे सर्वसामान्य जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील न्याती कॉर्नर मेनरोड ते तलाठी कॉलनी शिवाजीनगर या परिसरात अवघ्या २०० मीटर अंतरावर पाच ते सहा कोचिंग क्लासेस व शाळा व तसेच खासगी बँक व महाराष्ट्र बँक यांना सुद्धा काहीच पार्किंग व्यवस्था नसून सदर बँका रस्त्या लागत आहे, तसेच बँक ऑफ महाराष्ट्र समोर खाद्य पदार्थांचे स्टॉल लागतात, काही महाशय तर मुजोरपणे थेट रस्त्यावर गाडी उभी करून खाद्य पदार्थाचे गाडीवर किंवा बँकेत जाऊन बसता व परिणामी वाहतूक कोंडी होते. तसेच अगदी कॉर्नर पॉइंटला ही दूधवाले, फळभाजी विक्री करणारे बसतात. त्यामुळे आणखी वाहतूक कोंडी वाढते. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सदर परिसरात जानकाई शाळा, व प्रायव्हेट क्लासेस असून सदर रस्त्याने विध्यार्थ्यांची नेहमी वर्दळ असते सदर वाहतूक कोंडी विध्यार्थ्यांना देखील त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे नगरपंचायतीने त्वरित वाहतूक कोंडीबाबत काहीतरी तोडगा काढावा, अन्यथा शिवसेना स्टाईल ने आंदोलन छेडण्यात येईल अशा ईशारा देण्यात आला आहे. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख जितेंद्र वाघ, कळवण तालुकाप्रमुख अंबादास जाधव, शहर प्रमुख अजय पगार, उपशहर प्रमुख विनोद मालपुरे , आप्पा बुटे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शितलकुमार आहेर, युवा सेना उपशहर प्रमुख सचिन पगार, राकेश आहेर, कुंदन पगार, राहुल पगार, प्रमोद निकम, केतन निकम, सागर शिरसाट, चेतन रौंदळ, मनोज पगार, अमोल खैरनार व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

# अधिव्याख्यातांची आवश्यकता

ठाणे : (समर्थ गांवकरी)

शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे या संस्थेत शैक्षणिक वर्ष 2025-2026 च्या सम सत्राकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय तासिका तत्वावर अभ्यागत अधिव्याख्यातांची (Visiting Lecture) आवश्यकता आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारानी दि.29 डिसेंबर 2025 रोजी सकाळी ठिक 11.00 वाजता शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे येथे संबंधीत विभागात शैक्षणिक मूळ कागदपत्रासह स्वखर्चाने मुलाखतीस हजर राहावे. उमेदवारांनी संबंधित विषयाचे सादरीकरण व मुलाखतीच्या तयारीने उपस्थित राहावे. तसेच सोबत स्वतःचा बायोडेटा, मूळ शैक्षणिक कागदपत्रे व कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच सोबत ठेवावा.

# काँग्रेस तालुकाध्यक्षच्या जागेतील सराफा दुकान फोडले

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)





तालुक्यातील मुख्य रस्त्यावर असलेले, विद्यमान काँग्रेस तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे यांच्या किरायादाराचे सोन्या-चांदीचे दुकान अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे लॉक तोडून रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने लंपास केले. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अर्धापूर तालुक्यातील हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील राहुल ज्वेलर्स या सोने-चांदीच्या दुकानाच्या शटरचे लॉक अज्ञात चोरट्यांनी तोडून सव्वा लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. रहदारीच्या ठिकाणी झालेल्या या धाडसी चोरीमुळे व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. अर्धापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रानुसार, अर्धापूर कॉंग्रेस तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे यांच्या जागेत किरायेदार राहुल बालाजी बोकन रा. एरिगेशन कॉलनी अर्धापूर यांचे राहुल ज्वेलर्स हे सोन्या-चांदीचे दुकान आहे. या दुकानात दि.२६ रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे लॉक तोडून प्रवेश करीत सव्वा लाख रुपयांचा ऐवज, व चार हजार रुपये रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली. सकाळी दुकानाचे शटर तुटल्याचे निदर्शनास आल्यावर दुकान मालक राहुल बोकन यांनी दुकानाकडे धाव घेतली. त्यांनी तत्काळ पोलीसांना घटनेची माहिती दिली. या वेळी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम,व यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले हे सहकाऱ्यांसह घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा केला असता त्यात सोन्या-चांदीचे दागीने कि. अंदाजे १ लाख २५ हजार व नगदी ४००० रूपये असा एकुण १२९००० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.या चोरी प्रकरणी ज्वेलर्सचे मालक राहुल बोकन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनी सुरेश भोसले करीत आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप!



अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिसेवाडी विलासनगर येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य व गोड भोजन वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकारातून प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडी व शुभम संजय गायकर यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील जबाबदार घटकांनी शिक्षणासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागून त्यांचा आत्मविश्वास वाढतो, असेही यावेळी सांगण्यात आले.

# कुळधारकांची जमीन लाटण्याचा प्रयत्न

- १३७ एकर भूखंडाची बेकायदेशीर विक्री
- महाराष्ट्र महसुल न्याय अधिकरण कार्यालयाकडून न्यायाची अपेक्षा

पारनेर : (समर्थ गांवकरी)



पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील लक्ष्मी नारायण देव विष्णू मंदिर संस्थानच्या १३७ एकर जमिनी वर १९३२ पासून कायम स्वरूपी ताबा असलेल्या

ढवळपूरी येथील गरीब शेतकऱ्यांच्या कुळधारक हक्कांवर अतिक्रमण करण्याचा बेकायदा व फसवणुक करण्याचा प्रयत्न जमिनी खरेदी विक्री करणाऱ्या दलाल व्यक्तींकडून चाललेला आहे.

या प्रकरणाविषयी सविस्तर माहिती अशी की ढवळपुरी येथील लक्ष्मी नारायण देव विष्णू मंदिर संस्थानची पद्मनाथ शास्त्री यांनी 137 एकर भूखंडाची बेकायदेशीर खरेदी 2017 मध्ये पद्मनाथ हरी शास्त्री यांनी उत्तम नामदेव बग, ईश्वर पंडित बग , युनूस कासमभाई आत्तार यांना चार कोटी अकरा लाख रुपयांना जमिनी विकली होती या खरेदीखताचा दस्त क्रमांक ४९४६ /२०१७ च्या नोंदीत दाखवलेले चेक रक्कम अदा केलेली नाही. या भूखंडाची विक्री करण्यासाठी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारीसाहेब यांची कुठलीही परवानगी घेतली गेलेली नाही तसेच अहिल्यानगर येथील धर्मदाय आयुक्त कार्यालय मध्ये लक्ष्मीनारायण देव विष्णू मंदिर नावावर या जमिनीची कोणताही नोंद नाही. देव विष्णू मंदिर खेड पुणे यांचा ढवळपुरी येथील लक्ष्मीनारायण देव विष्णू मंदिर संस्थानचा कुठलाही संबंध नसताना सहाय्यक धर्मदाय आयुक्त साहेब पुणे यांची दिशाभुल करून जमीन विक्रीची परवानगी घेतली यामुळे पारनेर रजिस्टर ने आयुक्त साहेब पुणे यांच्या परवानगीवर खरेदी खत केले . बेकायदेशीर झालेल्या भूखंडाच्या विक्री बाबत कुळधारक शेतकऱ्यांनी कायमस्वरूपी जमीन मिळण्यासाठी तत्कालीन पारनेर तहसीलदार शिवकुमार आवळकंठे यांच्याकडे केस क्रमांक ३४/३५/ २०२१ मध्ये पारनेर तहसीलदार गरीब शेतकरी भाडेकरूंच्या बाजूने निकाल दिला असून त्यांना जमिनीवर कुळ घोषित केले आहे. जमिनीवर पुण्यामध्ये नोंदणीकृत असलेल्या विष्णू मंदिर ट्रस्टचे एकमेव विश्वस्त पद्मनाथ गुरु हरि शास्त्री यांनी यावजल दिलेली नसल्याने हा निर्णय अंतिम झाला होता. तत्कालीन पारनेर तहसीलदार शिवकुमार आवळकंठे यांनी कुळवहिवाट शेतकऱ्यांना मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ म खरेदी प्रमाणपत्र देऊन कुळवहिवाट शेतकऱ्यांनी शासकीय मुद्रांक शुल्क भरून सदर जमिनी खरेदीखत केले या शेतकऱ्यांचे 7/12 उताऱ्यावर संबंधित शेतकऱ्यांचे नावे ही जमीन झाली. या निकालानंतर सुरेश शास्त्री यांनी पारनेर श्रीगोंदा प्रांतअधिकारी यांच्याकडे केस क्रमांक १४७ / २०२३ अपिल दाखल केले मात्र सुरेश शास्त्री यांचा ढवळपुरी येथील लक्ष्मी नारायण देव विष्णू मंदिर संस्थानशी कुठलाही संबंध नसताना प्रांतअधिकारी गणेश रोठोड यांनी अपिल मंजूर केले. प्रांतअधिकारी यांनी कागदपत्रांची पडताळणी न करता अपील स्वीकारल्याने ही कारवाई कायद्याविरोधी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. प्रांतअधिकारी गणेश राठोड यांच्या निकालानंतर संबंधित शेतकरी महाराष्ट्र महसुल न्याय अधिकरण कार्यालय संभाजीनगर यांच्याकडे अपील दाखल केले असून संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व कागदपत्रांची पडताळणी करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची विनंती कुळधारक शेतकऱ्यांनी केली आहे.

## राष्ट्र कल्याण व मानव कल्याण या मुख्य उद्देशाने श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रामार्फत

# २० टक्के अध्यात्मिक व ८० टक्के समाजकार्य चालते : गुरुपुत्र नितीनभाऊ मोरे

- उज्जेन येथे होणाऱ्या राष्ट्रीय सत्संग मेळाव्यासाठी अकोले तालुक्यातील 350 सेवेकरी व 40 स्वयंसेवक जाणार!
- श्री महाकालच्या रांगोळीने व मुलींनी उभे केलेल्या ग्रामीण भागातील जिवंत देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधले!





**अकोले :** (समर्थ गांवकरी)

श्री स्वामी सेवा केंद्रामार्फत २० टक्के अध्यात्मिक व ८० टक्के समाजकार्य अखंडपणे सुरू असून, या कार्याचा मुख्य उद्देश राष्ट्रकल्याण व मानवकल्याण हाच असल्याचे प्रतिपादन गुरुपुत्र नितीनभाऊ मोरे यांनी केले.

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, पाटील गल्ली, अकोले येथे प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ५ जानेवारी रोजी उज्जैन येथील श्री महाकाल मंदिर परिसरात होणाऱ्या भस्म लिंगार्चन विधी निमित्त आयोजित राष्ट्रीय सत्संग मेळाव्याच्या मार्गदर्शनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी बोलताना गुरुपुत्र नितीनभाऊ मोरे म्हणाले की, सृष्टीची निर्मिती त्र्यंबकापासून सुरू झाली. त्याच त्र्यंबकात श्री गुरुदेव दत्त यांचा अवतार झाला. त्यांनी या भूतलावर श्रीराम, श्रीकृष्ण आणि सध्याच्या काळात श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या रूपाने अविष्कार घेतला.

पुढे श्री स्वामी समर्थ महाराज कर्दळीवनात प्रगट होऊन संपूर्ण भारतभूमीवर सर्वसामान्य माणसाच्या उद्धारासाठी कार्यरत राहिले. त्यांनी श्री साईबाबा, गजानन महाराज, शंकर महाराज अशा अनेक विभूतींच्या माध्यमातून हे कार्य पुढे चालू ठेवले.

विज्ञानयुगाशी सुसंगत राहून संसार करताना अध्यात्म व समाजकार्य घडवून आणण्यासाठी सद्गुरू पिठले महाराज यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्याचे कार्य सुरू केले. या कार्याची धुरा त्यांनी सद्गुरू मोरे दादा यांच्याकडे दिली. त्यानंतर हे कार्य पुढे नेत प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र अधिक व्यापक स्वरूपात कार्यरत झाले.

गुरुमाऊलींनी सेवेकऱ्यांना दत्तधाम व विविध तीर्थक्षेत्रांवर सेवा करण्याची संधी दिली. राष्ट्रावर व मानवावर येणाऱ्या संकटांचा विचार करून त्या त्या तीर्थक्षेत्रांवर सेवा केल्यामुळे संकटांची तीव्रता कमी झाल्याचा अनुभव आल्याचे त्यांनी सांगितले. गुरुमाऊलींनी केलेली संकटांबाबतची भाकिते खरी ठरली असून, त्यावर सेवेमार्फत योग्य उपाययोजना करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

येत्या नवीन वर्षात जानेवारी महिन्यात उज्जैन येथे श्री महाकाल चरणी सेवा रुजू करण्यासाठी भस्म लिंगार्चन विधी करण्यात येणार असून, इच्छुकांसाठी मंगळपूजनाचाही लाभ मिळणार आहे. या कार्यक्रमासाठी स्वतः श्री महाकाल यांनी गुरुमाऊलींना आमंत्रित केल्याचा भावनिक उल्लेख करत, "गुरूसोबत जाणे म्हणजे शंभर जन्मांचे पुण्य" असल्याचे गुरुपुत्र नितीनभाऊ मोरे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जोंधळे यांनी केले. तर श्री शेखर यांनी उज्जैन येथील मेळावा व विधींचे सविस्तर नियोजन मांडले. आभारप्रदर्शन संजय हुजबंद यांनी केले. त्यांनी अकोले तालुक्यातून ३५० सेवेकरी व ४० स्वयंसेवक उज्जैनला जाणार असल्याचे सांगून, "मेळाव्याची जी जबाबदारी दिली जाईल ती आम्ही सर्वजण निष्ठेने पार पाडू" असा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. तसेच नातवंड पार्कचे उद्घाटन गुरुपुत्र नितीनभाऊ मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी काढण्यात आलेल्या श्री महाकालांच्या भव्य रांगोळीने तसेच ग्रामीण भागातील मुलींनी साकारलेल्या जिवंत देखाव्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले व सर्वत्र कौतुकाचा वर्षाव झाला.

## लतादीदी, कवी ग्रेस यांचे दुर्मिळ स्मरणरंजन!



**पुणे :** (समर्थ गांवकरी)

विश्वविख्यात गायिका असणाऱ्या आपल्या ज्येष्ठ भगिनीकडून, आणि सर्वात आवडत्या कवीकडून स्वतःविषयीचे भावनोत्कट कौतुकोद्गार ऐकताना स्वतः भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर यांना पाहण्याचा योग रसिकांनी अनुभवला. आपल्या बंधुंविषयी बोलताना लतादीदींकडून त्यांच्या निर्मळ आवाजातील काही रचना, गाणी, गजल, श्लोक, ज्ञानदेवांच्या रचना, चित्रपटगीते यांचे गुणगुणणेही एक वेगळा अनुभव देणारे ठरले. पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या नुकत्याच झालेल्या ८९ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने ज्येष्ठ निर्माते अरुण काकतकर 'दीनायन कलापर्व' तर्फे या ध्वनिचित्रफिती रसिकांसमोर आणल्या आणि पं. हृदयनाथ यांच्या बालपणापासूनच्या आठवणींपासूनचा हृद्य प्रवास खुद्द लतादीदींकडून समोर आला. गायिका मनीषा निश्चल्स महक यांच्यातर्फे कार्यक्रमाचे संयोजन केले होते. याप्रसंगी भारती हृदयनाथ मंगेशकर, पं. सत्यशील देशपांडे, निवेदक सुधीर गाडगीळ, अरुण नूलकर, अरुण काकतकर तसेच मंगेशकर रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते. चित्रफीत निर्माते काकतकर यांनी हृदयनाथांना मिठी मारताच दोघेही गलबलून गेले. या दोन महाविभूतींना कॅमेरात कैद करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य असल्याचे भावोद्गार काकतकर यांनी काढले. या दुर्मिळ कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल डॉ. धनंजय केळकर यांनी अरुण काकतकर आणि मनीषा निश्चल यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

## स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**वडाळा महादेव:** (समर्थ गांवकरी)

श्रीरामपूर तालुक्यातील गोंधवणी येथील सरस्वती इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी २४ डिसेंबर बुधवार रोजी शाळेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात स्नेहसंमेलन पार पडले शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणाचा विकास व्हावा या उद्देशाने सतत वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येते तरी या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती मा श्री संजीवन दिवे साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सौ दिपालीताई प्रविण फरगडे सरपंच भैरवनाथनगर ग्रामपंचायत सामाजिक कार्यकर्ते श्री प्रविण फरगडे व ग्रा प सदस्य कांताताई शेळके नगरसेविका सौ सोनिया कक्कड सामाजीक कार्यकर्ते बिट्टू दादा कक्कड नगरसेवक दीपक वमने किरण दादा लबडे आनंद विद्यामंदिर चे संस्थापक श्री आढाव सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## गोवा–मुंबई महामार्गावर उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई!

### इन्सुली तपासणी नाक्यावर ११.६८ लाखांचा अवैध दारू साठा जप्त!

**सिंधुदुर्ग जिल्हा :** (समर्थ गांवकरी)



गोवा–मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर इन्सुली तपासणी नाका येथे राज्य उत्पादन शुल्क विभाग पथकाने मोठी कारवाई करत अवैधरीत्या वाहतूक केली जात असलेला सुमारे ११ लाख ६८ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई २३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता हॉटेल विवा क्लासिक समोर, सटमटवाडी (बांदा) येथे करण्यात आली.

तपासणीदरम्यान संशयास्पद स्थितीत असलेल्या MH-10-DT-5307 क्रमांकाच्या चारचाकी वाहनाची झडती घेतली असता, वाहनाच्या मागील भागात लपवून ठेवलेले विविध ब्रँडचे ३६ बॉक्स विदेशी मद्य आढळून आले. या प्रकरणी वाहन चालक नाभीराम अंबेडकर बागडे (वय ३०, रा. रामघाटी, ता. माडा, जि. सोलापूर) यास ताब्यात घेण्यात आले आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे ३ लाख ६८ हजार ६०० रुपये किमतीचे मद्य व ८ लाख रुपये किमतीचे चारचाकी वाहन यांचा समावेश असून, एकूण किंमत ११ लाख ६८ हजार ६०० रुपये आहे.

ही कारवाई महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अंतर्गत करण्यात आली आहे. सदर कारवाई दुय्यम निरीक्षक श्री. धनंजय सांवळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक श्री. विवेक कदम, दुय्यम निरीक्षक श्री. रणजित शिंदे तसेच जवान श्री. दीपक वाघडे, श्री. सागर सुंधेकर, श्री. अभिषेक घत्री आणि श्रीमती सविता चोपडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

या प्रकरणाचा पुढील तपास इन्सुली तपासणी नाका, सावंतवाडी येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे.

## अध्यक्षपदी अलका दराडे तर स्वागताध्यक्षपदी सुनंदा पाटील

**नाशिक :** (समर्थ गांवकरी)



गिरणा गौरव प्रतिष्ठान आयोजित चौथ्या अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका अलका दराडे यांची आणि स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ कवयित्री सुनंदा पाटील यांची निवड करण्यात आली.

मखमलाबाद रोडवरील भावबंधन मंगल कार्यालयातील शिक्षणमहर्षी अॅड.संभाजीराव पगारे साहित्य नगरीत १७ आणि १८ जानेवारी या कालावधीत हे संमेलन होणार आहे. संमेलनाचे उदघाटन तमाशा सम्राट भिमा सांगवीकर यांच्या हस्ते होणार आहे. १७ जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते पहाटे ६ वाजेपर्यंत रंगणाऱ्या शेकोटी कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी संवेदनशील साहित्यिक विवेक उगलमुगले यांची निवड करण्यात आली आहे. लावणी स्पर्धेचे उदघाटन प्रख्यात लावणी सम्राज्ञी रेश्मा परितेकर यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.शंकर बोऱ्हाडे लोककला गौरव पुरस्काराचे यंदाचे मानकरी गणेश चंदनशिवे, लावणी सम्राज्ञी माधुरी पवार उपस्थित राहणार आहेत.

गेल्या तीन संमेलनांप्रमाणेच विविध कार्यक्रमांचे आयोजन यावर्षीही करण्यात आले आहे. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष आणि स्वागताध्यक्षांचा शुक्रवार दि.२६ डिसेंबर रोजी सायंकाळी ६. ३० वाजता हुतात्मा स्मारकात सन्मान करण्यात येणार आहे. नाशिक कवी संस्थेचे अध्यक्ष इंजि. बाळासाहेब मगर, जयप्रकाश जातेगावकर, संजय करंजकर, प्रवीण जोशी, ज्येष्ठ उद्योजक उत्तमराव शिंदे, माजी आ.नानासाहेब बोरस्ते, मविप्र सरचिटणीस अॅड.नितीन ठाकरे, प्रा.सुमती पवार, प्राचार्य प्र.द.कुलकर्णी, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन विशाल टर्ले, किरण सोनार, मधुकर गिरी, सोमनाथ साखरे, तुकाराम ढिकले, प्रा.राजेश्वर शेळके, दशरथ झनकर, शितल कुयटे, भाग्यश्री चौधरी, पुजा दंडगव्हाळ,आशा गोवर्धने, रविकांत शार्दुल, संजय आहेर, प्रशांत कापसे यांनी केले आहे. संमेलनाध्यक्ष आणि स्वागताध्यक्षपदी साहित्य प्रांतातील दोन दिग्गज साहित्यिकांची निवड करण्यात आल्याने या संमेलनाच्या निमित्ताने स्त्रीशक्तीचा अनोखा गौरव करण्यात आल्याचे संयोजकांनी कळवले आहे.

## प्रभंजन भगत यांचे श्री रेणुका माहात्म्य

**वडाळा महादेव :** (समर्थ गांवकरी)

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्रीक्षेत्र रेणुका देवी आश्रमात श्री शाकंभरी नवरात्र निमित्ताने हरिभक्त परायण प्रभंजन भगत यांचे श्रीरेणुका महात्म्य कथा निरुपणाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आश्रमाच्या मुख्य विश्वस्त मातोश्री नलिनी देवी यांनी दिली आहे. दुर्गाष्टमी पासून शाकंबरी नवरात्र उत्सवात प्रारंभ होत असून रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी श्रीरेणुका देवीची महापूजा अभिषेक व घटस्थापना होऊन शाकंभरी नवरात्र प्रारंभ होणार आहे. नित्य श्री शाकंभरी महात्म्य वाचन तसेच दुपारी शाकभाजी नैवेद्य आरती व सायंकाळी नित्य महाआरती व उपासना होणार आहे गुरुवार दिनांक १ जानेवारी ते ३ जानेवारी दरम्यान रोज दुपारी तीन ते सहा या वेळेत लोणी येथील प्रख्यात हरिभक्त परायण प्रभंजन महाराज भगत यांचे श्री रेणुका महात्म्य कथा निरूपण होणार आहे.

## नव्या प्रोमोने महाराष्ट्रात उत्सुकतेचा माहोल!

**पुणे :** (समर्थ गांवकरी)



"दार उघडणार, नशिबाचा गेम पालटणार!" या दमदार थीमसोबत रितेश भाऊ घेऊन आले बिग बॉस मराठीचा नवा प्रोमो. कार्यक्रमाच्या सहाव्या सीझनची हवा सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पसरली असताना कार्यक्रमाच्या थीम विषयी कल्पना देणारा आणि मूड सेट करणारा बहुप्रतिक्षित प्रोमो समोर आला आहे. त्यावरून प्रेक्षकांनी अनेक अंदाज बांधायला सुरुवात केले असून यंदाचा खेळ केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून सदस्यांचे नशिब बदलणारा असल्याचं स्पष्ट दिसत आहे. "फॅन्सचा जीव जडला, की ते पाठ नाही सोडत… आणि आपण शब्द दिला की मागे नाही हटत…" अशा कडक शब्दांत रितेश भाऊंनी या सीझनचा बार उडवला आहे. नक्की दारा पलीकडे काय ट्विस्ट असणार? सदस्यांना हे सगळं कसं नव्या पेचात टाकणार? कोण होणार पास तर कोण होणार फेल? या सगळ्याची उत्तरं दार उघडल्यावरच मिळणार आहेत. पहा बिग बॉस मराठी सिझन ६, ११ जानेवारीपासून दररोज रात्री ८ वाजता आपल्या लाडक्या कलर्स मराठी आणि JioHotstar वर.

प्रोमो रिलीज होताच त्याचं प्रमुख आकर्षण ठरतंय रितेश भाऊंचे कोड्यातून गेम व घराची थीम सांगणारे प्रभावी संवाद. प्रत्येक प्रोमोमध्ये रितेश भाऊ प्रेक्षकांना काहीतरी नवं देतच असतात.

कधी सरप्राइझ, नवा लूक, वेगळी स्टाईल, खास स्वॅग हे त्यांच्या प्रोमोचं कायमचं वैशिष्ट्य राहिलं आहे. यंदाही तसंच काहीसं घडले आहे. या प्रोमोमध्ये यंदाच्या सीझनची थीम वेगळ्या पद्धतीतून प्रेक्षकांसमोर आणण्याकरीता भाऊ आपल्या एका हटके लूकमध्ये दिसत असून, या सिझनची टॅगलाईन "दार उघडणार, नशिबाचा गेम पालटणार!" सुद्धा प्रभावीप्रमाणे प्रेक्षकांसमोर आणली आहे. या सिझनचा खेळ महाराष्ट्राला खिळवून ठेवणार हे नक्की."

## भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन आनंदात साजरा होणार

**पुणे :** (समर्थ गांवकरी)



1 जानेवारी 2026 रोजी मौजे पेरणे येथे होणारा 209 वा भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळा मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा होणार आहे. जिल्हा प्रशासनाने यासंदर्भामध्ये सुमारे वीस लाख भीम अनुयायांना सर्व पायाभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून तयारी सुरू केलेली असून त्यामुळे जास्तीत जास्त आंबेडकरी अनुयायांनी या सोहळ्याला उपस्थित रहावे असे आवाहन भीमा कोरेगाव विजयस्तंभ दिन समन्वय समितीच्या वतीने अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केले आहे. अभिवादन सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयायांना पिण्याचे पाणी पार्किंग शौचालय यासह सर्वच पायाभूत सुविधा दरवर्षीपेक्षा अधिक संख्येने पुरविण्यात येणार आहेत या संदर्भामध्ये माननीय जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समिती समवेत समाजबांधवांच्या व समन्वय समितीच्या सहा पेक्षा अधिक बैठका पार पडलेल्या आहेत, या बैठकांमध्ये नागरिकांकडून प्राप्त सूचनांच्या आधारे अंतिम नियोजन करण्यात येत असून यावर्षीचे नियोजन अधिक दर्जेदार व सुविधा नियुक्त राहणार आहे समाजकंटक व चोरट्या लोकांवर लक्ष केंद्रित करून त्यांचा उपद्रव उत्सवावर होऊ नये यासाठी पुणे पोलीस आयुक्तालय तर्फे पहिल्यांदाच ड्रोन द्वारे फेस स्कॅनिंग यंत्रणाचा वापर करून कारवाई करण्यात येणार आहे.

## आरोग्यदायी वळणासह… : डार्क चॉकलेट बदाम संत्रा केक

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)



या नववर्षात बदाम पीठ, समृद्ध डार्क चॉकलेट, ताज्या संत्र्याची साल आणि मेपल सिरप यांचे सुंदर मिश्रण असलेल्या डार्क चॉकलेट बदाम संत्रा केकसह आपल्या साजऱ्या उत्सवांमध्ये उबदारपणा आणि तृप्तीचा स्पर्श जोडा. शेफ कविता सिंग यांनी काळजीपूर्वक तयार केलेली ही रेसिपी सणासुदीच्या चवींना सजग बेकिंगसह संतुलित करते.

तूप आणि अंड्यांचा वापर करून, आणि बदामाच्या पिठापासून बनवलेला हा केक मऊ आणि ओलसर असतो, ज्यात चॉकलेट आणि लिंबूवर्गीय फळांची समृद्ध चव असते. हा एक पौष्टिक पण स्वादिष्ट वर्षाअखेरचा मिष्टान्न आहे, जो बनवायला सोपा, इतरांसोबत वाटून घेण्यासाठी उत्तम आणि सणासुदीच्या बेकिंगची एक आधुनिक आवृत्ती आहे.

सणासुदीतील आहाराविषयी आपले मत मांडताना, मॅक्स हेल्थकेअर येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख ऋतिका सामद्दार सांगतात, "सणासुदीचे अन्न म्हणजे अतिरेक किंवा तडजोड असायलाच हवी असे नाही. कॅलिफोर्निया बदाम हे प्रथिने, फायबर, निरोगी फॅट्स, व्हिटॅमिन E आणि आवश्यक खनिजांचे नैसर्गिक स्रोत आहेत, त्यामुळे ते सणासुदीच्या रेसिपींमध्ये एक शहाणपणाची भर ठरतात. ते हृदयाच्या आरोग्यास आधार देतात, दीर्घकाळ ऊर्जा टिकवण्यास मदत करतात आणि तृप्तीची भावना निर्माण करतात— जी सुट्टीच्या काळात विशेषतः महत्त्वाची असते, जेव्हा खाण्याचा अतिरेक वाढतो. बेकिंगमध्ये बदामांचा वापर केल्याने साजरेपणाचा आनंद घेतानाच एकूण पोषण आणि आरोग्याला पाठबळ देता येते."समृद्ध, दिलासा देणारा आणि सणासुदीचा आनंद देणारा हा केक सुट्टीच्या काळासाठी परिपूर्ण डेझर्ट ठरतो— तृप्तीदायक असूनही संतुलित, अगदी या ऋतूसाठी योग्य. असा केक कसा तयार करायचा, ज्यामुळे प्रत्येकजण पुन्हा-पुन्हा चाखायला येईल, ते पुढे पाहूया:

डार्क चॉकलेट बदाम संत्रा केक

तयारीसाठी लागणारा वेळ: ६० मिनिटे

सर्व्हिंग्ज: ८-इंच केक (सुमारे १० स्लाइस)

साहित्य:

- बदामाचे पीठ – २ कप (१८० ग्रॅम)
- अंडी – ४ मध्यम आकाराची (१९६ ग्रॅम)
- डार्क चॉकलेट – १/२ कप (१०० ग्रॅम)
- मेपल सिरप – १/२ कप (११३ मि.ली.)
- तूप – १/४ कप (४० मि.ली.)
- ताज्या संत्र्याची किसलेली साल (ऑरेंज झेस्ट) – १ टेबलस्पून (४ ग्रॅम)
- संत्र्याचा रस – १/४ कप (४७ मि.ली.)
- व्हॅनिला एसन्स – १ टीस्पून (५ मि.ली.)
- बेकिंग पावडर – १ टीस्पून (३.८४ ग्रॅम)
- मीठ – चिमूटभर (०.१ ग्रॅम)

कृती :

- एका भांड्यात बदामाचे पीठ, बेकिंग पावडर आणि मीठ एकत्र करून कोरडे साहित्य तयार करा.
- दुसऱ्या भांड्यात अंडी फोडा, त्यात मेपल सिरप, व्हॅनिला एसन्स आणि संत्र्याचा रस घालून चांगले फेटा, जेणेकरून ओले साहित्य तयार होईल.
- डार्क चॉकलेट वितळवा (मायक्रोवेव्हमध्ये किंवा डबल बॉयलिंग पद्धतीने), त्यात संत्र्याची किसलेली साल आणि तूप घाला.
- कोरडे आणि ओले साहित्य एकत्र करून नीट मिसळा.
- तयार बॅटर ८-इंच केक टिनमध्ये ओता आणि वरून हलके टॅप करून समतल करा.
- आधी गरम केलेल्या ओव्हनमध्ये १८० अंश तापमानावर ४५ मिनिटे बेक करा.
- केक बाहेर काढून पूर्णपणे थंड होऊ द्या.
- स्लाइस कापा आणि सर्व्ह करा.